**प्रकल्प प्रवर्तक मे .जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण (जेएनपीए), नवी मुंबई यांच्या गाव - वाढवण, तालुका-डहाणू, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथे ९ (नऊ) कंटेनर टर्मिनल्स, ४ (चार) बहुउद्देशीय धक्के, ४ (चार) लिक्विड धक्के, रो-रो धक्का, कोस्टल धक्का, कोस्ट गार्ड धक्का आणि १०.१४ कि.मी. ब्रेक वॉटर, ड्रेजिंग आणि कंटेनर आणि कार्गो स्टोरेज क्षेत्र - १४४८ हेक्टर जमिनी इ. सह वार्षिक २९८ दशलक्ष टन क्षमतेच्या प्रस्तावित ग्रीनफिल्ड बंदर वाढवणच्या किना-यावर राष्ट्रीय महामार्ग ८ वरुन रोड जोडणी आणि वाणगाव स्टेशनपासून रेल्वे जोडणीसह ऑफशोअर क्षेत्रातील भरावाच्या जमिनीवर दमण किनाऱ्यावरून मिळणाऱ्या सागरी वाळूपासून सुमारे ६५ किमी अंतरावर उत्तरेकडे गाव - वाढवण, तालुका-डहाणू, जिल्हा-पालघर (४०१ ४०४)येथे विकसित करण्याच्या प्रस्तावाबाबत दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा क्रीडा संकुल मैदान, टेंभोडे, जिल्हा पालघर येथे आयोजित करण्यात आलेली पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीचा इतिवृतांत**

---

प्रकल्प प्रवर्तक मे .जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण (जेएनपीए), नवी मुंबई यांच्या गाव - वाढवण, तालुका-डहाणू, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथे ९ (नऊ) कंटेनर टर्मिनल्स, ४ (चार) बहुउद्देशीय धक्के, ४ (चार) लिक्विड धक्के, रो-रो धक्का, कोस्टल धक्का, कोस्ट गार्ड धक्का आणि १०.१४ कि.मी. ब्रेक वॉटर, ड्रेजिंग आणि कंटेनर आणि कार्गो स्टोरेज क्षेत्र - १४४८ हेक्टर जमिनी इ. सह वार्षिक २९८ दशलक्ष टन क्षमतेच्या प्रस्तावित ग्रीनफिल्ड बंदर वाढवणच्या किना-यावर राष्ट्रीय महामार्ग ८ वरुन रोड जोडणी आणि वाणगाव स्टेशनपासून रेल्वे जोडणीसह ऑफशोअर क्षेत्रातील भरावाच्या जमिनीवर दमण किनाऱ्यावरून मिळणाऱ्या सागरी वाळूपासून सुमारे ६५ किमी अंतरावर उत्तरेकडे गाव - वाढवण, तालुका-डहाणू, जिल्हा-पालघर (४०१ ४०४) येथे विकसित करण्याच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी जिल्हा क्रिडा संकूलाचे मैदान, सोनोपंत दांडेकर कॉलेजजवळ, कॉलेज रस्ता, टेंभोडे, तालुका, जिल्हा-पालघर - ४०१ ४०४, महाराष्ट्र राज्य येथे शुक्रवार दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आलेली होती .

श्री संजय भुस्कुटे, जनसंपर्क अधिकारी,मुख्यालय,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी उपस्थितांचे स्वागत करुन निमंत्रक,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना जनसुनावणी सुरवात करण्याची सूचना केली.

श्री. वीरेंद्र सिंह, उपप्रादेशिक अधिकारी, तारापूर-2, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हा पालघर आणि पर्यावरण जनसुनावणी समितीचे निमंत्रक श्री. गोविंद बोडके, (IAS) जिल्हा दंडाधिकारी, पालघर आणि पर्यावरण जनसुनावणी समितीचे अध्यक्ष; श्री. व्ही.एम. मोटघरे, सहसंचालक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, श्री. किरण हसबनीस, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे आणि पर्यावरण जनसुनावणी समितीचे सदस्य, पर्यावरणवादी, स्वयंसेवी संस्था, पत्रकार, माध्यम वाहिन्यांचे प्रतिनिधी आणि जेएनपीएचे अधिकारी आणि उपस्थित असलेले स्थानिक लोक /सहभागी आणि माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

निमंत्रक ,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

निमंत्रक यांनी सांगितले की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास प्रकल्प प्रवर्तक मे .जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण (जेएनपीए), नवी मुंबई यांच्या गाव - वाढवण, तालुका-डहाणू, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र येथे ९ (नऊ) कंटेनर टर्मिनल्स, ४ (चार) बहुउद्देशीय धक्के, ४ (चार) लिक्विड धक्के, रो-रो धक्का, कोस्टल धक्का, कोस्ट गार्ड धक्का आणि १०.१४ कि.मी. ब्रेक वॉटर,ड्रेजिंग आणि कंटेनर आणि कार्गो स्टोरेज क्षेत्र - १४४८ हेक्टर जमिनी इ. सह वार्षिक २९८ दशलक्ष टन क्षमतेच्या प्रस्तावित ग्रीनफिल्ड बंदर वाढवणच्या किना-यावर राष्ट्रीय महामार्ग ८ वरुन रोड जोडणी आणि वाणगाव स्टेशनपासून रेल्वे जोडणीसह ऑफशोअर क्षेत्रातील भरावाच्या जमिनीवर दमण किनाऱ्यावरून मिळणाऱ्या सागरी वाळूपासून सुमारे ६५ किमी अंतरावर उत्तरेकडे गाव - वाढवण, तालुका-डहाणू, जिल्हा-पालघर (४०१ ४०४) येथे विकसित करण्याच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला.

निमंत्रक यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसूचना ०१-१२-२००९ नुसार संवर्ग ए - कार्गो हाताळणी क्षमता > ५.० एमटी/वर्षे शेड्युल ७ (ई) - पोर्ट्स, हार्बर्स, ब्रेक वॉटर्स, ड्रेजिंग मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

निमंत्रक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकाने पर्यावरण मूल्यमापन समिती, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे टीओआर प्राप्त करण्यासाठी पूर्व-व्यवहार्यता/डीपीआर आणि इतर संबंधित वैज्ञानिक अहवालांसह ऑनलाइन विहित अर्ज सादर केला आणि त्यास मंजूरी दिनांक ०७/१०/२०२० व ०२/०६/२०२३ रोजी प्राप्त झालेली आहे.

जिल्हाधिकारी-पालघर यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास दिनांक १९ जानेवारी, २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण ,वने व हवामान बदल मंत्रालयाच् अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं . ई-

९३/२०२३ व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीरी/पीएच/बी-२३१२२१ एफटीएस-०१२४ दिनांक २१ डिसेंबर,२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली: -

१) जिल्हादंडाधिकारी, पालघर -अध्यक्ष
किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी
यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा)

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई - सदस्य
यांचे प्रतिनिधी –
प्रादेशिक अधिकारी – ठाणे,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,

३) उप प्रादेशिक अधिकारी,तारापूर-२, - आयोजक
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ ,
एमआयडीसी कंपाऊंड, पोस्ट-टीएपीएस,
बोईसर (प.), तालुका,जिल्हा-पालघर-४०१ ५०४

उपरोक्त अधिसूचनेनुसार दि.२२ डिसेंबर २०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता सदर पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास मा.जिल्हाधिकारी यांची मान्यता मिळाल्यावर उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर-२ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर, जिल्हा पालघर यांनी जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर स्थानिक, मराठी दैनिक वृत्तपत्र (लोकमत) आणि इंग्रजी राष्ट्रीय वृत्तपत्र (फ्री प्रेस जनरल) यात जनसुनावणीबाबत दि. १७ नोव्हेंबर २०२३ रोजी जाहीर सूचना प्रकाशित केली होती. यावर नागरीकांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबत आपापली मते, सूचना, हरकती, शंका तथा आक्षेप नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

तथापि दि. ०५ डिसेंबर २०२३ रोजी वाढवण बंदर विरोधी संघर्ष समितीची सभा मा. मुख्यमंत्री महोदयांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक संपन्न झाली ज्यामध्ये वाढवण बंदर विरोधी संघर्ष समितीच्या प्रतिनिधींसोबत झालेल्या चर्चेनुसार पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA) व इतर सर्व वैज्ञानिक अहवाल मराठीत दिल्यानंतर पर्यावरण जनसुनावणी आयोजित करणेसंबंधी प्राप्त निर्देशांमुळे दि. २२ डिसेंबर २०२३ रोजी होणारी जनसुनावणी पुढे ढकलण्यात आली तथापि पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ नुसार प्रकल्प प्रवर्तक जे.एन.पी.ए. यांच्यामार्फत EIA च्या संक्षिप्त अहवालाची मराठी आवृत्ती पुन्हा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांनी दिलेल्या निर्देशानुसार जे.एन.पी.ए. ने सर्व वैज्ञानिक अहवाल सर्व संबंधित ग्रामपंचायतींना मराठी भाषेमध्ये उपलब्ध करुन देण्या आल्या तसेच वाढवण वेबसाईटवर देखील त्यास प्रसिद्धी देण्यात आली.

तद्नंतर शुक्रवार दि. १९ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता जनसुनावणी घेण्याबाबत व जनसुनावणीचे स्थान बदलणे बाबत दैनिक मराठी वृत्तपत्र "लोकमत" मध्ये दि. १६ डिसेंबर २०२३ रोजी व राष्ट्रीय वृत्तपत्र (फ्री प्रेस जनरल) मध्ये इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना दि. १७ डिसेंबर २०२३ रोजी प्रकाशित केली. जाहीर जनसुनावणी सूचनेद्वारे नागरिकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सूचना, विचार, शंका, आक्षेप इ. नोंदविण्याचे आवाहन प्रसिद्धीद्वारे करण्यात आले.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक १७ जानेवारी, २०२४ रोजी विविध स्थानिक वृत्तपत्रांमध्ये व्यापक प्रसिध्दिसाठी आणि स्थानिक लोकांना त्यांचे निवेदन/आक्षेप/विचार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे पुढे पाठवण्यासाठी संबंधित गावातील ग्रामपंचायत कार्यालयात जमा करण्याची सुविधेबाबत माहिती देण्यासाठी जाहिरात प्रसिध्द केलेली होती. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे १३ जानेवारी, २०२४ रोजी जनसुनावणीबाबतची स्मरण सूचना प्रकाशित करण्यात आली.

त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA) अहवाल व संक्षिप्त अहवाल मराठी व इंग्रजीमध्ये जनतेस अवलोकनार्थ आणि माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हिल लाईन्स, नागपूर - ४४० ००१,

२) जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर,

३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,रायगड, पालघर,

४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, पालघर,

५) उप विभागीय दंडाधिकारी, तालुका-डहाणू, जिल्हा-पालघर,

६) तहसीलदार, तहसील कार्यालय-डहाणू/तलासरी/पालघर, जिल्हा- पालघर,

७) गट विकास अधिकारी, पंचायत समिती- डहाणू/तलासरी/पालघर, जिल्हा- पालघर,

८) सरपंच/ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, वाढवण, वरोर (ग्रुप ग्रामपंचायत), चिंचणी, देदाळे (ग्रुप ग्रामपंचायत), बावडे, तनाशी (ग्रुप ग्रामपंचायत), बडापोखरण, गुंगवाडा, ताडियाडे, धाकटी डहाणू, पोखरण, धुमकेत (ग्रुप ग्रामपंचायत), वासगाव, आसनगाव खुर्द (ग्रुप ग्रामपंचायत), वाणगाव, चंडीगाव, तवा (ग्रुप ग्रामपंचायत) व कासा (ग्रुप ग्रामपंचायत), तालुका-डहाणू, जिल्हा- पालघर,

तारापूर (ग्रुप ग्रामपंचायत),चिंचली, कुडण, नेवाळे, शिगाव (ग्रुप ग्रामपंचायत), हनुमान नगर, रावते (ग्रुप ग्रामपंचायत), खानिवडे (ग्रुप ग्रामपंचायत), निंबारे (ग्रुप ग्रामपंचायत), नानिवली, ब्र-ह्याणपूर (ग्रुप ग्रामपंचायत),तालुका-पालघर, जिल्हा-पालघर.

९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

१०) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण) - मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२

११) प्रादेशिक अधिकारी, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, ठाणे

१२) उप प्रादेशिक अधिकारी, तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जिल्हा-पालघर

१३) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई

उपप्रादेशिक कार्यालय, तारापूर-2, एमपीसीबी, तारापूर, जिल्हा-पालघर यांना 18 जानेवारी 2024 पर्यंत प्रस्तावित प्रकल्पाबाबत 6,087 सूचना/ हरकती प्राप्त झाल्याची माहिती निमंत्रकांनी दिली.

निमंत्रक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधी दिली जात असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

निमंत्रक यांनी प्रतिपादन केले की, ही समिति लोकांचे फक्त पर्यावरण संदर्भातील मत,आक्षेप, सूचना नोंदवून घेईल. या समितिस एखादी गोष्ट नाकारणे किंवा त्या गोष्टीची शिफारिश करण्याचा कोणताही अधिकार नाही. जनसुनावणीत सहभागींनी उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेपांची नोंद घेतली जाईल आणि ती बैठकीच्या इतिवृत्तात समाविष्ट केली जाईल. त्याचप्रमाणे, प्रकल्प प्रवर्तकाचा सुधारित पर्यावरण मूल्यमापन अहवाल आणि अध्यक्षांच्या मान्यतेनंतर बैठकीचे इतिवृत्त एमपीसीबी मुख्यालयामार्फत पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना व्हिडिओची नोंद घेऊन सादर केले जातील. सदर बैठकीचे रेकॉर्डिंग, बैठकीत नोंदवलेल्या सूचना आणि हरकती. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी पर्यावरण जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांनी प्रकल्प प्रस्तावकांना सादरीकरण सुरू करण्यासाठी विनंती केली.

अध्यक्ष,पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सांगितले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रस्तावित ग्रीनफिल्ड बंदर वाढवण गावी विकसित करण्यासाठी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे. तरी ही शासकीय प्रक्रिया शांततेने पार पडण्यासाठी सर्व उपस्थितांनी सहकार्य करावे ही सर्वांना पर्यावरणविषयक समितीचा अध्यक्ष म्हणून आणि प्रशासनातर्फ विनंती करण्यात येत आहे. बैठकीत सर्व उपस्थित प्रस्तावित प्रकल्पाविषयी त्यांच्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप किंवा टीकाटिप्पणी असल्यास त्या नोंदवू शकतात.

त्यावेळी काही उपस्थित जनसुनावणी आयोजनाबाबत आक्षेप नोंदवित होते.अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती आणि इतर यांनी केलेल्या याचिकेबाबत दिनांक १८ जानेवारी,२०२४ रोजी पारित केलेल्या आदेश व निर्देशांनुसार आयोजित करण्यात आलेली आहे.

सदरहू याचिका/प्रकरणाबाबत दिनांक १८ जानेवारी २०२४ रोजी या प्रकरणावर खंडपीठासमोर चर्चा झाली आणि माननीय मुंबई उच्च न्यायालयाने निर्देश दिले की जेएनपीए आणि एमपीसीबी सोबत याचिकाकर्ते/संघटना यांच्या सदस्यांना आवश्यक ती वाहतूक सुविधा पुरविण्याची व्यवस्था करावी. याचिकाकर्त्यांच्या प्रतिनिधींनी एमपीसीबी आणि जेएनपीए च्या प्रतिनिधींना 19 जानेवारी 2024 रोजी जनसुनावणीत सहभागी होण्यास इच्छुक व्यक्तींची संख्या दर्शवावी. एमपीसीबी आणि जेएनपीए त्यानुसार, इच्छुक प्रतिनिधींना नियोजित सुनावणीला उपस्थित राहण्यास प्रवृत्त करण्यासाठी सर्व वाहतुकीची आवश्यक व्यवस्था करतील.

जेएनपीए त्यांच्या प्रतिनिधींना त्या संदर्भात नामनिर्देशित करेल जे एमपीसीबी आणि याचिकाकर्त्यांच्या प्रतिनिधींशी समन्वय साधतील जेणेकरून त्यांना सार्वजनिक सुनावणीला उपस्थित राहता येईल.

जेएनपीए त्या संदर्भात त्यांचे प्रतिनिधी नियुक्त करेल जे एमपीसीबी आणि याचिकाकर्त्यांच्या प्रतिनिधींशी समन्वय साधतील जेणेकरून त्यांना सार्वजनिक सुनावणीला उपस्थित राहता येईल.

जेएनपीए चे वकील त्याबाबतचा आवश्यक तपशील याचिकाकर्त्यांच्या आदरणीय वकिलांना त्वरित प्रदान करतील.

प्रकल्प प्रवर्तकांनी उपलब्ध केलेलंया EIA अहवालाच्या भाषांतरावर याचिकाकर्त्यांच्या वतीने उपस्थित करण्यात आलेले आक्षेप योग्य कार्यवाहीसाठी खुले ठेवण्यात आले आहेत. उद्या होणाऱ्या जनसुनावणीवर अवलंबून, प्रसंग उद्भवल्यास पुढील जनसुनावणी आयोजित करण्याच्या कोणत्याही विनंतीवर विचार करणे एमपीसीबी साठी खुले असेल. उपरोक्त निर्देशांसह रिट याचिका निकाली काढली आहे.

त्यानुसार, माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जेएनपीएने तत्काळ खालील व्यवस्था केल्या आहेत:

1. जेएनपीए बाजूच्या समन्वयकांची नावे याचिकाकर्त्यांच्या वकिलांना देण्यात आलेली होती.
2. जिल्हाधिकारी पालघर आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रतिनिधींसोबतची पुढील बैठक झाल्यानंतर, माननीय मुंबई न्यायालयाच्या दिनांक १८ जानेवारी, २०२४ च्या आदेशानुसार स्थानिक लोकांच्या वाहतुकीसाठी व्यवस्था करण्यासाठी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळच्या ४० बसेस आरक्षित करण्यात आलेल्या होत्या.

३. जेएनपीएने स्वतःचे 30 ते 40 अधिकारी/समन्वयक स्थानिक गावांसाठी खेड्यापासून सार्वजनिक सुनावणीच्या ठिकाणी सुरळीत वाहतुकीसाठी व्यवस्था केलेल्या बरोस बरोबर पुरवले होते.

अध्यक्ष, पर्यावरण जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना आवाहन केले की, प्रस्तावित प्रकल्पाबाबतच्या लेखी सूचना आणि आक्षेप हे बैठकीत नोंदवू शकता,त्याची पोच देण्यात येईल व लेखी सूचन आक्षेप यांना प्रकल्प प्रवर्तक हे लेखी उत्तर देतील. बैठकीत प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक तोंडी सूचना, हरकती, टीका करता येईल. तथापि, सहभागींनी त्यांच्या सूचना,प्रश्न शांतपणे मांडावेत,तो इतिवृताचा भाग असेल.

त्यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत सादरीकरण करण्याची सूचना केली. त्यावेळी काही उपस्थित हे जनसुनावणी आयोजित केलेल्या प्रक्रियेबाबत एकत्रितपणे विचारणा करीत होते.

अध्यक्ष यांनी सांगितले की त्याचप्रमाणे प्रकल्प बाधित गावातील जे नागरिक काही कारणांमुळे उपस्थित राहू शकत नाही, त्यांच्यासाठी ग्रामसेवक, सरपंच यांना त्यांच्या लेखी सूचना आज स्विकारण्याच्या सूचना करण्यात आलेल्या आहेत. अशा रितीने स्थानिकांना सूचना, आक्षेप नोंदविण्याची पुरेपुर संधी देण्यात आलेली आहे.

काही उपस्थितांनी स्थानिकांना आणणा-या सर्व बसेस येत असल्याने सादरीकरण सुरु करु नये अशी विनंती केली असता बरेच लोक सकाळी लवकर आलेले आहेत, त्यांच्यावर अन्याय होईल, उशीरा येणा-या स्थानिकांसाठी परत सादरीकरण दाखविण्यात येईल अशी माहिती देण्यात आली.

माननीय अध्यक्षांच्या परवानगीने, प्रकल्प पर्यावरण सल्लागाराने प्रकल्प आणि पर्यावरण व्यवस्थापन योजनेबद्दल सादरीकरण केले. ते म्हणाले की, जवाहरलाल नेहरु बंदर प्राधिकरण (जेएनपीए) यांनी वाढवण बंदराच्या विकासासाठी महाराष्ट्र सागरी मंडळासोबत सामंजस्य करार केलेला असून एसपीव्ही मे. वाढवण पोर्ट प्रोजक्ट लिमिटेड आणि महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड यांचा अनुक्रमे ७४% आणि २६% हिस्सा आहे.

केंद्र सरकारने वाढवण बंदरास १३/०२/२०२० रोजी वाढवण बंदरास प्रमुख बंदर म्हणून तत्वतः मान्यता दिलेली आहे. वाढवण बंदर संपूर्ण विकसित झाल्यानंतर जगातील अग्र दहा कंटेनर हबपैकी एक होईल. प्रकल्पाची अंदाजे किंमत ७६,२२० कोटी रुपये आहे. प्रकल्पाची पाण्याची गरज व पुर्तता ही जवळील सूर्या नदीपासून भागविण्यात येईल. सदरहू प्रकल्पास स्थापन व विकसित करण्यासाठी डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण यांनी ३१ जुलै,२०२३ रोजी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालानुसार मान्यता प्रदान केलेली आहे.

प्रकल्पाच्या बांधकाम टप्प्यातील पर्यावरण व्यवस्थापनासाठी अंदाजपत्रक भांडवली किंमत ३०२ लाख तर कार्यकारी टप्प्यात भांडवली किंमत ४४३ लाख, तर प्रकल्प कार्यान्वित टप्प्यात खर्च करण्यात येणार आहे. सदरहू प्रकल्पात कॉर्पोरेट पर्यावरण जबाबदारी (सीईआर)साठी अंदाजपत्रक रुपये १९० कोटी राखीव ठेवण्यात आलेले आहेत. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पामुळे परिसरातील अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होणार आहे.

सादरीकरणानंतर प्रकल्प प्रवर्तक यांच्याकडून प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण माहिती असलेली फिल्म दाखविण्यात आली. भविष्यात प्रकल्पाचा होणारा फायदा, कार्गो हाताळणीतील वाढ, भविष्यात जागतिक दर्जाचे होणारे वाढवण बंदर याबाबत फिल्ममध्ये सर्व माहिती होती.

फिल्म दाखविल्यानंतर अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांना जिल्हा प्रशासनातर्फे शांत राहून आपापल्या जागांवर स्थानापन्न होण्याची विनंती केली. जर काही लोक उशिराने येत असतील, तर सादरीकरण परत दाखविण्यात येईल व त्याबाबत सूचना, हरकती मांडण्याचे आवाहन करण्यात आले. सूचना, हरकती मांडताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गावाचे नांव सांगण्यात यावे.

निमंत्रक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सुरुवातीला सांगितलेले आहे की ही समिती कुठलाही निर्णय घेत नाही. आपण उपस्थित केलेल्या सूचना, विचार, टीकाटिप्पणी यांचा बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येतो व भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांना सादर करण्यात येतो. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेते. ही जनसुनावणी प्रक्रिया चालू राहिल, कारण जे वेळेवर आलेले आहेत, त्यांच्यावर अन्याय होईल. नंतर आलेल्या लोकांसाठी परत सादरीकरण करण्यात येईल. तरी सर्व उपस्थितांनी जिल्हा प्रशासन, पोलिस प्रशासनास सहकार्य करावे. आपण बसले आहात, त्याठिकाणी माईक उपलब्ध करुन देण्यात येईल.

त्याचप्रमाणे प्रकल्पाच्या बाधित क्षेत्रात ज्या तीस ग्रामपंचायती आहेत, तेथेही लेखी सूचना, हरकती, आक्षेप स्विकारणे सुरु झालेले आहे.

उप प्रादेशिक कार्यालय, तारापूर-२, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर, जिल्हा-पालघर येथे प्रकल्पाबाबत पेपरमध्ये जाहिर सूचना प्रकाशित झाल्यानंतर सुचना, हरकती नोंदविण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे ईमेलवरसुध्दा हरकती, सूचना या नोंदविण्यात आलेल्या आहेत. तथापि, उपस्थितांना विनंती आहे की त्यांनी प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक हरकती व सूचना नोंदवाव्यात.

<u>पर्यावरणीय जनसुनावणी दरम्यान उपस्थित केलेली मते, प्रश्न, सूचना/आक्षेप आणि प्रकल्प प्रवर्तक /प्रकल्प पर्यावरण सल्लागार/पर्यावरण जनसुनावणी समितीने दिलेली उत्तरे/ आश्वासने याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-</u>

**(अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी वेळोवेळी सर्व सहभागींना पूर्ण नाव आणि पत्ता सांगण्याचे आवाहन केले, तरी अनेक सहभागींनी तशी माहिती दिली नाही. त्यामुळे नाव नोंदवताना स्थानिक व्यक्ती किंवा महिला असा उल्लेख करण्यात आलेला आहे).**

१) प्रतिनिधी, ' वाढवण बंदर विरोधी संघर्ष समिती ' यांनी, वाढवण बंदर विरोधी युवा संघर्ष समिती आणि इतर सर्व संघर्ष समिती यांच्यातर्फे विनंती केली की, बैठकीत फक्त स्थानिक व मच्छिमार व्यक्तींनाच बसण्याची परवानगी देण्यात यावी. येथे असे निदर्शनास आलेले आहे की, येथे भाड्याने पैसे देऊन आणलेले रेल्वेचे कामगार,

परप्रांतीय अगोदरच जाणूनबूजून प्रकल्प अधिकारी यांनी आणलेले आहेत.ज्यांचा या प्रकल्पाशी काडीमात्र संबंध नाही,त्या लोकांनी येथे उपस्थित राहू नये अशी स्थानिकांची मागणी आहे.

एका स्थानिकांनी मागणी केली की, भूमीपुत्रांच्या भावनांचा आदर करुन अगोदरच बैठकीत बसलेल्या परप्रांतीयांना बाहेर जाण्याची सूचना करावी ही नम्र विनंती आहे.

एका स्थानिकाने मागणी केली की, त्याचप्रमाणे जे परप्रांतीय आहेत,त्यांना जेएनपीए ने डीपीआर उपलब्ध केलेला होता व आम्हां स्थानिकांना,मच्छिमारांना, मच्छिमार सोसायटी यांना डीपीआर का उपलब्ध करण्यात आलेला नाही? जर त्यांना सदरहू प्रकल्पाचा डीपीआर माहित नाही,तर त्या परप्रांतीयांची मते ग्राह्य धरण्यात येऊ नयेत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आपल्या सर्व सूचनांची नोंद घेण्यात येत आहे.सार्वजनिक सुनावणीच्या संदर्भात सर्व अहवाल वाढवण वेबसाइटवर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत आणि कोणीही तो अभ्यासू शकतो.मात्र ही जाहिर जनसुनावणी असल्याने कुठल्याही व्यक्तीला प्रतिबंधित करता येणार नाही. तरी उपस्थितांनी सूचना, हरकती मांडाव्यात.

उपस्थित स्थानिकांनी मागणी केली की स्थानिक लोक येथे पोचलेले नाहीत. जरी शासनाने बसची सेवा उपलब्ध केलेली आहे, तरीही बसेस वेळेवर गावात आलेल्या नाहीत.एका स्थानिकाने सांगितले की मा. जिल्हाधिकारी यांचा मान ठेवून आम्ही लेखी पत्र सादर करत आहोत.त्याने सांगितले की सर्व स्थानिक, ग्रामस्थ येईपर्यंत जनसुनावणी थांबविण्यात यावी असे लेखी पत्र सादर करत आहोत.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार स्थानिकांनी दिलेल्या यादीप्रमाणे बसेस गेलेल्या असून बसेसच्या दोन-दोन फे-या झालेल्या आहेत.अध्यक्ष,पर्यावरण जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, त्यानंतर येणाऱ्या स्थानिक लोकांसाठी सादरीकरणाची पुनरावृत्ती केली जाईल आणि त्यांना त्यांचे मत मांडण्याची संधी दिली जाईल. येथे सकाळी नऊ वाजल्यापासून लोक आलेले आहेत.त्यांच्यावर अन्याय करणे योग्य नाही.नविन लोकांसाठी परत सादरीकरण करण्यात येईल व सर्वांनाच प्रश्न, सूचना, हरकती उपस्थित करण्याची संधी देण्यात येईल. तीन-चार स्थानिकांनी एकत्रित परत मुद्दा उपस्थित केला की ज्यांचा या प्रकल्पाशी संबंध नाही, ज्यांना या प्रकल्पाशी देणेघेणे नाही, अशा लोकांना जिल्हा प्रशासनाने आत का येऊ दिले?

त्यावेळी अध्यक्ष यांनी सूचना केली की बसण्यासाठी खुर्च्यांची व्यवस्था, कंपार्टमेंट व बसल्याजागेवर माईकची सोय करण्यात आलेली आहे. तसेच आपला मुद्दा उपस्थित करताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गावाचे नांव सांगून मुद्दा उपस्थित करण्यात यावा.त्याची नोंद घेण्यात येऊन त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. तरी कृपया मुद्दा परत परत उपस्थित करु नका, आपले संपुर्ण नांव व पत्ता सांगण्यात यावा, त्याची नोंद इतिवृतात घेण्यात येईल

**मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्देशांचे व कायद्यातील सर्व तरतुदींचे पालन करण्यात येईल. जर एखादी व्यक्ती या प्रकल्पामुळे बाधित/प्रभावित होत असेल, तर त्यांना बोलण्याची संधी देण्यात येणार आहे.**

तरी पहिल्या कंपार्मेंटपासून जनसुनावणी प्रक्रिया सुरवात करण्यात येईल, स्वयंसेवकांना माईक उपलब्ध करण्याची सूचना देण्यात येते.अध्यक्ष यांनी आवाहन केले की "कृपया विचार, आक्षेप, टीकाटिप्पणी हे परत परत/रिपीट करण्यात येऊ नयेत. येथे प्रत्येक व्यक्तीला, संघटनेला बोलण्याची संधी देण्यात येईल, आपण तोंडी किंवा लेखी निवेदन सादर करु शकता.आपण मुद्दा उपस्थित केल्यानंतर त्वरितच प्रकल्प प्रवर्तक त्याचा खुलासा/उत्तर देण्यात येईल.त्याची इतिवृतात नोंद घेण्यात येईल.तरी कृपया आपले संपूर्ण नांव व गाव सांगून आपले मत मांडवावेत."

२) श्री विनोद पाटील,अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती संघर्ष समिती पालघर जिल्हा अध्यक्षः-

प्रकल्पामुळे बाधित होणारे बरेच लोक येथे आलेले आहेत.ज्यांचा या प्रकल्पाशी काहीही संबंध नाही, अशा लोकांनी समर्थन केलेले असेल आणि ते परप्रांतीय असतील, तर त्यांचे आधारकार्ड तपासण्यात यावे, ते कार्ड जर बाहेरचे असेल, तर त्यांना त्वरित अटक करण्यात यावी अशी संघर्ष समितीतर्फे मागणी आहे. तसेच येथे जे परप्रांतीय आहेत, त्यांनी स्वतःहून येथून निघून जावे,तोपर्यंत ही जनसुनावणी प्रक्रिया ही तात्पुरती स्थगित करण्यात यावी. तसेच गावोगावच्या बसेस यायच्या आहेत,तरी मा. अध्यक्षांना विनंती आहे की तोपर्यंत ही जनसुनावणी प्रक्रिया थांबवावी.

जनसुनावणी समिती अध्यक्ष यांनी परत आवाहन केले की मागे बसलेल्यांना प्रश्न मांडावयाचे आहेत, ते त्यांना मांडू देण्यात यावेत. काही लोक येणार असतील,तर ते आल्यानंतर परत सादरीकरण करण्यात येईल. मात्र मुद्दा उपस्थित करताना संपूर्ण नांव, पत्ता सांगण्यात यावा, त्याची नोंद घेऊन त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. जे संबंधित नाहीत,त्याची नोंद घेण्यात येणार नाही.तरी जे संबंधित आहेत, त्यांना कृपया सूचना, आक्षेप नोंदविण्याची संधी देण्यात यावी. प्रस्तावित प्रकल्पामुळे प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष प्रभावित होणारे जे उपस्थित आहेत, त्यांना येथे बोलण्याची संधी देण्यात यावी. ही जनसुनावणी असून आपण आपल्या अधिकाराचा वापर करावा व निर्भयतेने प्रश्न,सूचना, आक्षेप मांडावेत.येथे महिला वर्ग मोठ्या प्रमाणात उपस्थित आहेत, तरी त्यांनाही सूचना,आक्षेप नोंदविण्याचे आवाहन करण्यात येते.

३) श्री रामकृष्ण जगन्नाथ तांडेल, कार्याध्यक्ष, महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती, गाव-केळवा, जिल्हा-पालघर-

मा. अध्यक्ष यांना विनंती करण्यात येते की, मागच्या २-४ दिवसांपूर्वी आमच्या संघटनांची सभा मा. पोलिस अधिक्षक यांनी घेतलेली होती. त्यावेळी कुठलाही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होऊ नये अशी सूचना त्यांनी केलेली होती व त्यास आम्हीसुध्दा पाठिंबा दिलेला आहे. ही जनसुनावणी सनदशीर, लोकशाही मार्गाने होईल. त्यासाठी कफ परेड, मुंबईपासून, झाईपासून सर्व मच्छिमार समाज आलेला आहे. येथील भूमीपुत्र येथे आलेले आहेत, त्यांचे म्हणणे आम्ही रितसर मांडू. परंतु विनंती आहे की बसेस आलेल्या नाहीत, तरी त्यांनी येऊ दयावे. परत परत सादरीकरण करण्यात वेळ जाईल, तरी बसेस आल्यानंतरच जनसुनावणी प्रक्रिया चालू करण्यात यावी.

तसेच पूर्वी सूचना केल्यानुसार ज्यांचा वाढवण बंदराशी काहीही संबंध नाही, जे परप्रांतीय आहेत, ते रेल्वेचे कामगार येथे आणलेले आहेत, तरी त्यांना येथून बाहेर काढण्यात यावे, ही विनंती.

येथे अध्यक्ष यांनी पुन्हा विनंती केली की जे येथे उपस्थित आहेत, ते त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी, विचार मांडू शकतात.आता वारंवार सूचना करण्यात येते की उपस्थितांनी सूचना करताना आपले संपूर्ण नांव व गाव सांगणे आवश्यक आहे.जर संबंधित नसेल,तर त्याची नोंद घेण्यात येईल याची ग्वाही देण्यात येते. तरी संबंधितांनी आपल्या सूचना, आक्षेप नोंदवावेत ही विनंती. अध्यक्ष यांनी सांगितले की कायदा व सुव्यवस्था पाळणे हे सर्वांचेच कर्तव्य असून प्रशासनास सहकार्य करावे. येथे सकाळी नऊ वाजल्यापासून लोक आलेले असून त्यांच्यावर अन्याय करता येणार नाही. उपस्थित सुचना, प्रश्नांना प्रकल्प प्रवर्तक त्वरित उत्तर देतील. तरी आपण आपल्या सूचना मांडाव्यात. स्वयंसेवकांना सूचना करण्यात येते की ज्या व्यक्तींना बोलावयाचे आहे, त्यांना माईक पोहचविण्याची व्यवस्था करावी.

अध्यक्ष यांनी सांगितले की मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार व स्थानिकांनी दिलेल्या गावांच्या यादीनुसार सकाळीच गावामध्ये बसेस पाठविलेल्या आहेत सर्व बसेस आलेल्या आहेत तरी उपस्थितांना विनंती आहे की प्रस्तावित वाढवण बंदर प्रकल्पाबाबत आपण सूचना,हरकती असल्यास त्या उपस्थित करण्यात याव्यात अशी माझी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती म्हणून विनंती आहे. ज्यांना कोणाला म्हणणे मांडावयाचे आहे, ते मांडू द्यावे. जिल्हा प्रशासन, पोलिस प्रशासनाचे सहकार्य आहे. येथे उपस्थित पत्रकार, मिडीयाचे प्रतिनिधी आहेत, तेही प्रस्तावित प्रकल्पाविषयी आपले विचार मांडू शकतात. ज्या स्वयसेवकांच्या हातात कॉडलेस माईक आहेत त्यांनी कंपार्टमेंटमधील बोलणा-यांना देण्यात यावेत.

अध्यक्ष यांनी परत आवाहन केले की सर्व बसेस आल्या असून उपस्थितांनी त्यांच्या सूचना, आक्षेप नोंदवावेत.

४) त्यावेळी श्री वैभव वझे,वाढवण विरोधी संघर्ष समिती यांनी विनंती केली जर सर्व बसेस आल्या आहेत, तर सादरीकरण सर्वांसाठी परत दर्शविण्यात यावे.तसेच येथे जमलेले स्थानीक मच्छिमार बंधू,स्थानिक बंधू आणि भगिनी यांना विनंती आहे की शांतपणे सादरीकरण ऐकून घ्यावे,गोंधळ घालून कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होणार नाही याची काळजी घेण्यात यावी. अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तकांना पुन्हा सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण परत केले.

५) श्री विक्रम अंबिरे,चिंचणे गाव -

माझा प्रश्न ऐकून घ्याल का.वाढवण बंदर विकसित करताना प्रकल्पाच्या दोन्ही बाजूस - दक्षिण आणि उत्तर बाजूस चार - साडेचार मीटरची संरक्षित भिंत (Protected Wall) बांधण्यात येणार आहे. त्यामुळे बोटी स्थिर राहण्यासाठी ही व्यवस्था आहे.

श्री वैद्य, स्थानिक रहिवासी, यांनी पर्यावरण जनसुनावणी समितीला विनंती केली की सार्वजनिक सुनावणी सकाळी 11:00 वाजता होणार आहे. आता 12:00 वाजले आहेत. त्यांचे म्हणणे ऐकण्यासाठी स्थानिक लोक येथे आले असून त्यांचे अर्ज घेण्यात आले आहेत. त्यामुळे त्यावर काय निर्णय होणार हे जाणून घेण्याची स्थानिकांची इच्छा आहे

प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर सादरीकरण, सुविधा हा पुढचा प्रश्न आहे. आम्ही निषेध करण्यासाठी येथे आहोत. आंदोलनादरम्यान विचारण्यात आलेल्या प्रश्नांना शासनाकडून उत्तरे अपेक्षित आहेत.तरी त्या प्रश्नांची उत्तरे लवकरात लवकर देण्यात यावीत ही विनंती.

अध्यक्ष,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी म्हणाले की, विनंती केल्याप्रमाणे सादरीकरण पुन्हा दाखवण्यात आले असून आता उपस्थितांनी कंपार्टमेंटनिहाय प्रश्न विचारावेत.त्याचा खुलासा प्रकल्प प्रवर्तकाकडून लगेच केला जाईल. तसेच, आपण सादर केलेल्या लेखी सूचना, हरकती नोंदविल्या जातील आणि तो नोंदणीचा भाग असेल.श्री वैभव वझे, वाढवण विरोध संघर्ष समिती यांनी कृपया प्रश्न विचारण्यास सुरुवात करावी.

श्री वैभव वझे यांनी पोलिस अधिक्षक यांनी विनंती केली की वाढवण बचाव समितीचे चार पदाधिकारी यांना पोलिसांनी अटक केलेले आहे. हे दबावतंत्र वापरता येणार नाही त्यांना सोडविल्याशिवाय आमचा बैठकीत प्रतिसाद मिळणार नाही. तातडीने त्यांनी येथे आणले पाहिजे. प्रश्न विचारणा-यांना जर जिल्हा प्रशासन डांबून ठेवत असेल तर ही बाब गंभीर आहे. त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नाही.तर प्रशासनाच्या बळजबरीची आम्ही निषेध व्यक्त करुन आम्ही जिल्हा प्रशासनास या जनसुनावणीत सहकार्य करणार नाही.जोपर्यंत ते चौघेजणही येथे येत नाहीत,तोपर्यंत जनसुनावणी ही चालू होणार नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की पोलीस अधीक्षक योग्य ती कारवाई करतील.जनसुनावणी सुरू आहे. तरी सहभागींनी आपले प्रश्न व हरकती नोंदवाव्यात. कृपया कुणालाही सूचना, हरकती, विचार देण्यापासून परावृत्त करू नका, ही सर्वांना विनंती आहे. ज्या कंपार्मेंटमधीन प्रश्न विचारायचे आहेत, त्यांनी मायक्रोफोन हातात धरून प्रश्न विचारावेत.

६) श्री विनोद पाटील, स्थानिक व्यक्ती -

ही जनसुनावणी सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.या वाढवण बंदराला आमचा, सर्व गटांचा विरोध आहे. तसेच ही जनसुनावणी सुरू असेल तर तो विरोध व्यक्तिशः व्यक्त करण्याची गरज नाही.तरी ही जनसुनावणी रद्द करावी.काही व्यक्तींनी बैठक मुदतवाढ रद्द करण्यासाठी सामूहिक घोषणा दिल्या.

त्यावेळी, अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक सूचना व हरकती नोंदविण्याचे आवाहन केले. तुम्ही ते तोंडी किंवा लेखी मांडू शकता, ग्रामपंचायत कार्यालयातही सूचना व हरकती स्वीकारण्याची व्यवस्था आहे. तुम्ही तुमच्या सूचना, हरकती ईमेलद्वारेही नोंदवू शकता.कृपया प्रशासनाला सहकार्य करा.

७) श्री रामकृष्ण तांडेल -

महामार्ग, बुलेट ट्रेनबाबत अशा अनेक जनसुनावणी झाल्या आहेत, असा आक्षेप त्यांनी घेतला. सर्वांनी विरोध केला, तरीही सर्वांना बोलण्यास सांगून जनसुनावणी घेण्यात आली. आता ते प्रकल्प सुरू झाले आहेत. जनतेची फसवणूक झाली, इथे असे करू नका. मात्र ही जनसुनावणी रद्द करावी, बंदर उभारणीला आमचा पूर्ण विरोध आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी याठिकाणी सूचना व हरकती मांडताना नाव व गाव नमूद करावे, असे सूचित केले. त्यावेळी एका स्थानिक महिलेने आम्हाला एकच सांगायचे आहे की हे बंदर रद्द करावे. सदर महिलेने केलेल्या बंदीच्या घोषणेला सर्वांनी जोरदार घोषणाबाजी करत पाठिंबा दिला.त्यावेळी अध्यक्षांनी सभा शांततेत सुरू ठेवण्याची सूचना केली. अशा प्रकारे आंदोलन करू नका, लेखी स्वरूपात आपले म्हणणे मांडावे, असे आवाहन अध्यक्षांनी केले.

८) दिक्षिता डावनेः-

हरित पट्टा उद्ध्वस्त करून सरकार कोणता विकास करत आहे ते कळेल का? देशाची प्रगती होत असेल तर आपली अधोगती का?

त्यावेळी पोलिसांनी बळजबरीने ताब्यात घेतलेल्या चौघांना तात्काळ सोडावे, त्याशिवाय जनसुनावणी होणार नाही, अशी मागणी एका स्थानिकाने केली. अटक करण्यात आलेले सर्वजण परत आल्याशिवाय कोणीही मत मांडू नये, असे आवाहनही स्थानिकांनी उपस्थितांना केले.

९) श्री दत्ता कडबड, आदिवासी एकता परिषदः-

अशा अनेक सुनावण्या झाल्या आणि आमची फसवणूक झाली. कायद्याचे राज्य असेल तर अशा जनसुनावणीची फसवणूक होऊ नये, अशी विनंती करतो. महामार्ग, बुलेट ट्रेनला आमचा विरोध आहे. आता बैठकीतील सर्वांनीच बंदराला विरोध केला आहे. तरी ही जनसुनावणी तात्काळ थांबवावी व या प्रकल्पाचा आम्ही निषेध करत आहोत. आम्ही कोणत्याही परिस्थितीत बंदर बांधू देणार नाही.

१०) श्री मिलिंद राऊत -

त्यांनी तमाम भूमिपुत्रांना विनंती केली की, पोलिसांनी अटक केलेले आमचे बांधव येईपर्यंत शांतपणे बसू. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आतापर्यंत मांडण्यात आलेल्या सूचना व हरकतींची नोंद घेण्यात आलेली आहे. तरी उपस्थितांनी सूचना व हरकती नोंदवाव्यात.

११) श्री वैद्यः-

ते म्हणाले की, बंदराच्या विस्ताराला विरोध करण्यासाठी सर्व स्थानिक मच्छीमार संघटना, स्थानिक लोक, संभाव्य बाधित स्थानिक याठिकाणी आले आहेत. मात्र, त्यांनी त्यांचे मत मांडलेच पाहिजे. सदर प्रकल्प राबविण्यासाठी शासन पूर्णतः तयार आहे. या प्रकल्पाबाबत तक्रारी नोंदवण्यासाठी आम्हाला येथे आमंत्रित केले आहे.

तक्रारी नोंदवल्या गेल्या नाहीत तर सरकार म्हणेल कोणाचीही तक्रार नाही. तरी ज्यांनी बंदराच्या विरोधात अभ्यासपूर्ण माहिती मिळवली आहे त्यांनी ती इथे जरूर मांडावी. ते मांडले पाहिजेत, तरीही प्रश्न उपस्थित होत नाहीत. माझा या प्रकल्पाला पूर्ण विरोध आहे. मात्र, आपण आपले प्रश्न मांडले

प्रकल्प प्रवर्तकांनी प्रत्येकाला प्रकल्प माहितीपत्रके वितरित केली आहेत. पहिला मुद्दा स्पष्ट करताना, जेएनपीए म्हणते की या प्रकल्पासाठी कोणत्याही गावाची किंवा अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नाही. पण बंदर विकसित होऊन पूर्ण झाल्यावर बंदरातून रेल्वेला जाण्यासाठी रस्ते बांधावे लागतील.त्यामुळे त्यासाठी किती जमीन संपादित करावी लागेल?

ते म्हणाले की, वाढवण बचाव समितीचे जे पदाधिकारी आहेत त्यांना पोलिसांनी बळजबरीने उचलून नेले आहे. ते निकाली काढल्याशिवाय बैठकीत प्रतिक्रिया देणार नाही. त्यांना तातडीने येथे आणावे. जिल्हा प्रशासन प्रश्नकर्त्यांना धारेवर धरत असेल तर ही बाब गंभीर आहे.

त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नाही. प्रशासनाच्या या जबरदस्तीचा आम्ही निषेध करणार असून या जनसुनावणीत आम्ही जिल्हा प्रशासनाला सहकार्य करणार नाही, जोपर्यंत हे चौघेही येथे येत नाहीत तोपर्यंत जनसुनावणी पुढे जाणार नाही.

अध्यक्ष,पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सकाळी ११.०० वाजल्यापासून ही जनसुनावणी सुरू आहे. पोलीस प्रशासन सर्व संबंधित बाबींचा विचार करून निर्णय घेईल. कायदा व सुव्यवस्था विघडवण्याचा प्रयत्न करणाऱ्यावर पोलिस कायदेशीर कारवाई करतील, अशी कायदेशीर तरतूद आहे. तरी संघर्ष समितीच्या सदस्यांनी आपले मत मांडावे.

EIA २००६ च्या अधिसूचनेनुसार, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात आयोजित करणे आवश्यक आहे. येथे जिल्हा प्रशासन आम्हाला नियमांचे पालन करण्याच्या सूचना देत आहे मात्र आमच्यावर दबाव टाकण्यासाठी जाणीवपूर्वक संघर्ष समितीच्या पदाधिकाऱ्यांना अटक करत आहे.

कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारीही जिल्हा प्रशासनाची आहे. त्यामुळे आमच्यावर दबाव टाकण्यासाठी येथे पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. त्यांनी दूर राहून कायदा व सुव्यवस्था राखली पाहिजे. प्रशासनाकडून या सर्व निगमांचे पालन केल्याशिवाय आम्ही जनसुनावणी प्रक्रिया सुरू ठेवणार नाही.

१२) श्री ब्रायन लोबो, कष्टकरी शेतकरी संघटना:-

येथील राजकीय नेत्यांनी बाहेरचे लोक आणले आहेत आणि स्थानिकांना बाहेरच राहावे लागत आहे .कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न राजकीय नेते आणि भाडोत्री मंडळींमुळे निर्माण होतो .मात्र, ज्यांनी भाडोत्री आणले ते गुन्हेगार असून त्यांना अटक झाली पाहिजे.

१३) श्री ब्रायन लोबो, यांनी मत मांडले की कायदा आणि सुव्यवस्था ही प्रशासनाची जबाबदारी आहे, याची जाणीव प्रशासनाला असावी.

१४) स्थानिक महिला - केणी -

जनसुनावणीसाठी आम्हाला कोणतीही घाई नाही. आम्ही रात्रभर थांबायला तयार आहोत. अध्यक्ष, पर्यावरणवियक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले या जनसुनावण्या ही एक शासकीय प्रक्रिया आहे. तरी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्यात यावे. आपणास सूचना, आक्षेप यांची नोंद करण्याची वारंवार विनंती करण्यात येत आहे.

१५) श्री ब्रायन लोबो, कष्टकरी शेतकरी संघटना:-

आपण सर्वांनी या प्रकल्पाला वारंवार विरोध केलेला असून प्रशासनाने त्याची दखल घेतली असेल तर सूचना व हरकती नोंदवण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. तुम्ही आमच्यावर जबरदस्ती करत आहात. तीच गोष्ट पुन्हा पुन्हा सांगायची गरज नाही. आपणा सर्वांचा या प्रकल्पाला विरोध आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी या मताचीही नोंद घेण्यात आल्याचे सांगितले.समितीचे अध्यक्ष यांनी ज्यांनी त्यांचे नाव आणि पत्ता दिला त्या सर्वांची नोंद करण्यात आली आहे. तसेच विविध मच्छीमार, आदिवासी संघटनांचे प्रतिनिधी आहेत, त्यांनाही या प्रकल्पाबाबत सूचना, हरकती, टीका करण्यासाठी आमंत्रित करण्यात आलेले आहे.

<u>१६) उषा अशोक **माच्छी** , झाई गाव:-</u>

आमच्या लोकांना बळजबरीने अटक केली तर आम्ही काय बोलणार, त्यांना आधी सोडविले पाहिजे. समितीचे अध्यक्ष यांनी प्रश्न विचारताना आधी तुमचे नाव आणि गाव सांगा, असे आवाहन केले.

श्री. वैद्य यांनी अध्यक्षांना विनंती केली की त्यांनी आमच्या माणसांची माहिती दिली तर लोक शांत होतील. वाहतुकीमुळे उशीर झाला असून ते काही वेळात येतील, असे अध्यक्षांनी सांगितले .मात्र, सरकारी प्रक्रिया थांबू नये. ती सुरू ठेवावी.

१७) श्री नरेन्द्र काशीनाथ मरदे ,राहणार – धाकटी डहाणू, जिल्हा-पालघर,-

मी श्रीराम प्रतिष्ठानचा सेक्रेटरी आहे. प्रस्तावित वाढवण बंदरात जी गावे बाधित होणार आहेत, उदा - वाढवण, वरोर, गुमआळे, धाकटी डहाणू, त्यांच्यावर विपरित परिणाम होणार आहे. त्यावर उपाययोजना पुढील प्रश्न रोजगारीचा तर रोजगार हा सर्वांनाच मिळालाच पाहिजे तिसरा प्रश्न जर हा प्रकल्प झाल्यास अर्थव्यवस्था मजबूत होईल व भारत एक महासत्ता होईल. चौथा प्रश्न मी कोणत्याही पक्षाचे नांव घेत नाही. पण या देशाला चांगला पंतप्रधान मिळालेला आहे.

त्यावेळी सर्व उपस्थितांनी संबंधित व्यक्तीविरुध्द आरडाओरडा केला.

त्यावेळी अध्यक्ष यांनी कोणाही व्यक्तीली वैयक्तिक मत मांडून देण्याची सूचना केली कोणावरही दबाव आणू नये. आपले मत मांडण्याचा प्रत्येकाला कायदेशीर अधिकार आहे. तर कोणाही व्यक्तीला त्याचे वैयक्तिक मत मांडताना त्यास विरोध करु नये.ज्याला विरोध करायचा आहे तो विरोधी बोलेल तर कोणालाही बोलताना प्रतिबंध करु नये. तसेच कोणीही आपले भाषण करत बसू नये, तर प्रकल्पाबाबत मत मांडावे.

१८) श्री भारत बायडा– स्थानिक व्यक्ती - त्यांनी मत मांडले की -

आम्ही वाढवण बंदराला विरोध करण्यासाठी आलो असून येथे रोजगाराचा प्रश्न नाही. हे लक्षात घेतले पाहिजे. याची दखल घेण्यात आल्याचे अध्यक्षांनी सांगितले.

१९) स्थानिक व्यक्ती

पोलिसांनी जबरदस्तीने पकडलेल्या तिघांना येथे आणण्यात आले आहे. सर्वांनी शांत राहावे. प्रकल्पाला आमचा विरोध राहणार आहे. त्यासाठी प्रत्येकाने शांत बसून आपले विचार मांडले पाहिजेत.

२०) श्री अशोक शिंगाडा, महाराष्ट्र आझाद पक्षः-

येथील प्रत्येकाची मागणी आहे की हा प्रकल्प रद्द व्हायला पाहिजे. शंभर टक्के लोकांचा विरोध असतानाही जर हा प्रकल्प राबविणार असतील, तर ही हुकूमशाही की लोकशाही? याचे उत्तर देण्यात यावे

दुसरा प्रश्न- तसेच बंदर विकसित करताना - भरणी (Reclamation) करताना जे दगड वापरणार आहात, ते येथील डोंगर फोडूनच करणार आहात काय, ही भरणी (Reclamation) केल्यानंतर दुसरीकडील समुद्राच्या पाण्याची पातळी वाढेल. त्यामुळे ज्या बाजूस पाण्याची पातळी वाढेल, तेथे जीवितहानी होणार आहे.

येथे रोजगाराचा मुद्दा उपस्थित करण्यात आला तर आम्हांला बंदर नको आणि नोकरीची भीक नको येथील किनारपट्टीवरुन घोळ मच्छीने आमचे पोट भरते. तर येथील १०० टक्के लोकांचा प्रकल्पास विरोध असून जबरदस्तीने प्रकल्प राबविणार असल्यास जनता तुमच्या गाडीखाली झोपण्यास मागे पुढे पाहणार नाही. तरी जनतेचा प्रकल्पास शंभर टक्के विरोध आहे.

२१) श्री भरत वैराळे, आदिवासी एकता परिषद कार्यकर्ता:-

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सांगण्यात येत आहे की जे विरोधात बोलत आहेत, त्यांचे माईक बंद करण्यात येत आहेत, तर जे प्रकल्पाच्या बाजूने बोलतात,त्यांचे माईक हे चालू ठेवण्यात येतात. येथे प्रशासनाची कोणती बाजू आहे. आमचे एकच मागणी आहे की हा विनाशकारी प्रकल्प येथे नको. ज्यांचा समुद्राचा संबंध नाही, ते लोक पुढे बसलेले आहेत, त्यांचा व स्थानीक मच्छिमार, स्थानिक लोक यांच्याशी काहीही संबंध नाही. जीवाची पर्वा न करता रात्रंदिवस समुद्रात मासे पकडायला जातात, त्या कोळयाच्या व्यथा जाणा. तरी येथील बाहेरच्या लोकांनी जनसुनावणीत खोट घालू नये. येथील भूमीपुत्र शांत बसणार नाही.

२२) श्री वैभव अशोक वझे, वाढवण बंदर विरोधी संघर्ष समिती सचिवः-

आम्ही गेले ३२ वर्षे वाढवण बंदराच्या विरुध्द लढत असून नुसता रस्त्यावरचा विरोध नसून न्यायालयीनसुध्दा विरोध आहे.मात्र सदरहू प्रकल्पामुळे होणारा पर्यावरणीय व सामाजिक परिणाम याबाबत आमचे मत उपस्थित करण्याची संधि दिल्याबद्दल धन्यवाद. मात्र अनेक प्रश्न येथे उपस्थित झालेले आहेत

पहिला प्रश्न - मा. मुख्यमत्र्यांबरोबर झालेल्या बैठकीतील सूचनांनुसार,जेएनपीएने आम्हांला स्थानिक भाषा मराठीत अहवाल उपलब्ध करुन दिले. तरी येथे एक पॅरिग्राफ वाचून दाखवितो, त्याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. त्या पॅरिग्राफचे स्पष्टीकरण आम्हांला समजेल असे देणार आहात काय?

अध्यक्ष यांनी प्रकल्प प्रवर्तक स्पष्टीकरण देतील असे आश्वासन दिले.

जो अहवाल मराठीत उपलब्ध करण्यात आला,तो गुगल भाषांतर केलेले आहे.येथे Nature of Port याचे भाषांतर बंदराचा निसर्ग असा केलेला आहे. तर सर्वसामान्य मराठी माणसाला याचा अर्थबोध होत नाही. अशा ब-याच त्रुटी अहवालात आहेत. त्यामुळे प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारा पर्यावरणीय आघात किती व कसा होईल हे ईआयए मराठी अहवालातून समजत नाही.यासाठी गेल्या नऊ तारखेस मा. मुख्यमंत्री,मा. जिल्हाधिकारी, मा.महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना एक अर्ज सादर केलेला आहे. तसेच मा. उच्च न्यायालयानेसुध्दा याची नोंद घेतली.

तरी सदरहू ईआयए आपल्या मराठी भाषेत उपलब्ध करुन नंतर ही जनसुनावणी परत आयोजित करण्यात यावी. तरी या ईआयए अहवालातील विश्लेषण करुन स्पष्टीकरण देणार आहात काय? यासाठी २-३ दिवस लागतील,आमची थांबण्याची तयारी आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की मा. मुख्यमंत्र्यांबरोबर झालेल्या बैठकीनुसार काही शास्त्रीय व तांत्रिक शब्द हे प्रथमच मराठीत भाषांतर होत होते.त्यामुळे काही त्रुटी राहिल्याचे आम्ही अमान्य करत नाहित. पण अगदी अल्पकाळात तज्ज्ञ व्यक्तींची सेवा उपलब्ध करुन तो अहवाल तयार करण्यात आला.

श्री वझे यांनी आक्षेप नोंदविला की कोणी दिले हे नको,तर सामान्य माणसाला समजेल असा अहवाल उपलब्ध करुन देण्यात यावा.प्रस्तावित प्रकल्पामुळे होणारा संभाव्य पर्यावरणीय व सामाजीक परिणाम आम्हांला जाणून घ्यायचा आहे. थोडा वेळ लागत असेल, तरीही आम्हांला अहवाल उपलब्ध करुन देण्यात यावा.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सहसंचालक (हप्रनि)यांनी प्रकल्प प्रवर्तकांना श्री वझे यांनी प्रस्तावित प्रकल्पामुळे संभाव्य पर्यावरणीय व सामाजिक परिणाम याबाबत स्पष्टीकरण देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ईआयए अधिसूचनेनूसार आपणास जो संक्षिप्त अहवाल उपलब्ध करुन द्यावयाचा आहे, तो संक्षिप्त अहवाल आम्ही योग्यप्रकारे दिलेला आहे. मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानूसार तांत्रिक अहवाल हा अल्प काळात तज्ज्ञ व्यक्तीकडून तयार करण्यात आला, त्यातील त्रुटी आम्ही अमान्य करत नाही. मात्र कार्यकारी संक्षिप्त अहवाल (Executive summary) आम्ही मराठीत उपलब्ध केलेला आहे. जरी ईआयए अहवाल व तांत्रिक अहवाल मराठीत प्रकाशित झालेली असले, तर स्थळ टीपमध्ये निर्देश असतात की काही स्पष्टीकरणासाठी मूळ इंग्रजी अधिसूचना लक्षात घ्यावी तरी निर्देशांची पूर्तता जेएनपीएने केलेली आहे.

श्री वझे यांनी एनआयओ व सीएनएफआरआय चे कोणी प्रतिनिधी नाही का याबाबत विचारणा केली. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी श्री वझे यांना सांगितले आपण आपले तांत्रिक मुद्दे, पर्यावरणीय मुद्दे, मत्स्यविभागा संदर्भात असतील ( fisheries), तर ते मांडावेत, ते भारत सरकारच्या तज्ज्ञ समितीसमोर निश्चितच चर्चिले जातील. कायद्याच्या तरतुदीनुसार प्रकल्प प्रवर्तकांना आपण उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांचा खुलासा हा करावाच लागणार आहे.

**२३) श्री ब्रायन लोबो, कष्टकरी संघटना प्रतिनिधीः-**

श्री ब्रायन लोबो यांनी एक मराठी पॅरा वाचून दाखविला त्याचा अनूवाद करुन देण्याची विनंती केली. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की याची नोंद प्रकल्प प्रवर्तक यांनी आणि जिल्हाधिकारी कार्यालय यांनीही नोंद घेतलेली आहे.

श्री लोबो यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना २००६ मधील ६.४ प्रमाणे स्पष्टीकरण मागितले तर त्याचे स्पष्टीकरण मिळाले नाही याची नोंद घेण्याची त्यांना मागणी केली. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की येथे प्रत्येक शब्दाची नोंद होत आहे.

**श्री वैभव** अशोक वझे, वाढवण बंदर विरोधी संघर्ष समिती सचिव यांनी मागणी केली की जनसुनावणी अधिसूचनेनुसार बैठकीत उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेपांचे शेवटी वाचन होते, ते येथे होईल अशी अपेक्षा आम्ही करावी का? बैठकीचे इतिवृत्त वाचूनच जनसुनावणी ही पूर्ण होत नाही. सहसंचालक, (हवा प्रदूषण

नियंत्रण),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी श्री लोबो यांना त्यांचे सर्व मुद्दे हे एकदाच मांडण्याची सूचना केली, जेणेकरुन इतरांनाही बोलण्याची संधि मिळेल.

श्री लोबो यांनी मुद्दा मांडला की प्रकल्प प्रवर्तकांना टीओआर निर्देशानूसार चोवीस बाबींवर अभ्यास करणे आवश्यक आहे. मी ९ जानेवारीला पत्राव्दारे म.प्र.नि. मंडळ, जिल्हाधिकारी कार्यालय यांना अभ्यास अपूर्ण असल्याचे कळविलेले आहे. मा. मुख्यमंत्र्यांच्या भेटीच्यावेळी हाच मुद्दा उपस्थित करण्यात आलेला होता. अभ्यास अपूर्ण म्हणजे जनतेसमोर सर्व माहिती उपलब्ध करण्यात आलेली नाही.तरीसुध्दा जनसुनावणी ही आयोजित करण्यात आलेली आहे ईआयए अधिसूचनेनुसार सर्व माहिती उपलब्ध करणे अपेक्षित आहे.

टीओआरच्या निर्देशांनुसार "two seasons additional baseline data covering monsoon and winter seasons with specific focus on offshore marine mammals movement and fish aggregation sites with special focus on off shore and mining areas and port reclamation areas".

तर आमचा आक्षेप आहे की आपला अभ्यास हा अपूर्ण आहे. अभ्यास ही दोन मोसमात करण्याची गरज होती, एक पावसाळ्यात व एक थंडीच्या दिवसात. हा तुमचा अहवाल ऑक्टोबर, २०२३ मध्ये दाखल करण्यात आला, तेव्हा थंडीचा मोसम सुरु झालेला नव्हता. त्या अहवालात उल्लेख आहे की मार्च, २०२५ पर्यंत अभ्यास चालू राहणार. तरीसुध्दा जानेवारी, २०२४ मध्येच जनसुनावणी ठेवली आहे हा पहिला आक्षेप आहे.

दुसरा आक्षेप म्हणजे अभ्यास हा कुठे करायचा? तर एक आहे दमणला, जो आपण केलेला आहे. तर दुसरा- Port Reclamation Area - रिक्लेमशन क्षेत्रातच म्हणजे वाढवणलाच जेथे भराव होणार आहे, तेथे पावसाळ्यात आणि थंडीमध्ये अभ्यास आवश्यक आहे तर तो झालेले नाही.

तिसरा आक्षेप - जे सस्तन ( mammals ) प्राणी आहेत, त्यांचा अभ्यास, त्यांची हालचाल. त्याचप्रमाणे मासे एकत्रीत येण्याची जागा ( fish aggregation site) याबाबत सर्वेक्षण व माहिती.

प्रकल्प प्रवर्तकाने असा अभ्यास केल्याचे सांगितले आणि दमण येथे असा अभ्यास ऑगस्ट, 2023 आणि ऑक्टोबर 2023मध्ये भारतीय प्राणीवैज्ञानिक सर्वेक्षणाद्वारे केला गेला होता तसेच दुय्यम डेटा अभ्यासासाठी वापरला गेला होता आणि दुय्यम डेटावर आधारित दोन हंगाम आणि ते बांधकामादरम्यान वाळू उधारीच्या खड्ड्याच्या संपूर्ण क्षेत्राचे निरीक्षण केले जाईल आणि उद्भवल्यास ते कमी करण्यासाठी उपाययोजना करेल. ZSI चा अहवाल EIA अहवालाचा एक भाग आहे आणि तो सर्व संबंधित ग्रामपंचायतींना उपलब्ध करून दिला जातो.

**२४) येथील एका स्थानिक व्यक्तीने सर्व माईक चालू करावेत असा आक्षेप घेतला. येथे भूमिपुत्र आहेत, त्यांना काही आक्षेप घ्यायचे आहेत, पण त्यांचे माइक बंद आहेत. तरी माईक पुन्हा सुरु करावा**

**आम्हाला आवाज ऐकू येत नाही, असा आक्षेप एका स्थानिक महिलेने घेतला. अध्यक्ष यांनी प्रश्न मांडण्याची भूमिका मांडली. तसेच आमचे बरेच लोक बाहेर उभे आहेत त्यांना राहायला हवे. मंडपात प्रवेश करणाऱ्यांसाठी बसण्याची व्यवस्था असल्याचे अध्यक्ष यांनी सांगितले.**

२५) श्री मिलिंद राऊत, वाढवण बंदर विरोधी युवा संघर्ष समिती:-

श्री ब्रायन लोबो यांनी विचारलेल्या प्रश्नाला अनुसरुन प्रश्न आहे की MoES – Ministry of Earth Science चे पत्र आहे.त्यात दमणची माती, वाळू आणणार आहेत तर त्याबाबत MoES – Ministry of Earth Science चे पत्र आहे की ते कोणतीही परवानगी देत नाहीत - मायनिंग ऑफ बरो पीट सँड तर जर परवानगी देता येत नाही, तर अभ्यास हा कसा झाला?

प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की अभ्यासाबाबत प्रश्न होता तर टीओआर ज्यांनी मंजूर केला, त्या विभागाने म्हणजे MoEF & CC हा अभ्यास Zoological Survey of India ला करण्यास सांगितला होता. त्यांना दोन मोसमांचा अभ्यास व मॉनिटरींग २०२४ पर्यंत करायला लावलेली आहे. ही मॉनिटरिंग बंदर पूर्ण होईपर्यंत करायला लावलेली आहे तर अभ्यास पूर्ण झालेला आहे काय, तर उत्तर अभ्यास पूर्ण झालेला आहे.

दुसरा मुद्दा जे दोन मोसम अभ्यास करावयाचा आहे, तर दोन मोसमांचा अभ्यास झालेले असून दुय्यम डेटा (secondary data) सुध्दा वापरलेला आहे. कारण समुद्र किना-याचा अभ्यास ही वर्षानूवर्षे केला जातो. त्या Zoological Survey of India बाकी सर्व सस्तन प्राण्यांचा अभ्यास वर्षानूवर्षे केलेला आहे.

श्री मिलिंद राऊत यांनी विचारणा केली की जर खणीकर्म विभाग परवानगी देतो, तर आम्हांला जी कागदपत्रे उपलब्ध करण्यात आली, त्यामध्ये तो संबंधित कागद का नाही, याचा खुलासा करण्यात यावा. आम्हांला अभ्यासासाठी चुकीची कागदपत्रे उपलब्ध करण्यात यावी, याची नोंद घेण्यात यावी. ती परवानगी खणीकर्म विभाग देत असून त्यांनी ती राखीव ठेवलेली आहे. त्या प्राप्त परवाने आम्ही जोडलेले आहेत.

श्री मिलिंद राऊत यांनी विचारणा केली की, जर खणीकर्म विभाग परवानगी देतो, तर आम्हांला जी कागदपत्रे उपलब्ध करण्यात आली, त्यामध्ये तो संबंधित कागद का नाही, याचा खुलासा करण्यात यावा. संपूर्ण कागदपत्रे आम्हाला अभ्यासासाठी उपलब्ध करून द्यावीत याची नोंद घ्यावी.

श्री लोबो यांनी माहिती दिली की मायनिंग क्षेत्राबरोबरच भरावाच्या क्षेत्रातही अभ्यास करावा लागतो. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की दमणचा अहवाल हा Zoological Survey of India यांनी केलेला आहे.दोन मोसमांचा अहवाल उपलब्ध आहे.

लोबो यांनी आक्षेप नोंदविला की टीओआरनुसार अतिरिक्त बेसलाईन डेटा उपलब्ध नाही. त्यांनी आक्षेप नोंदविला २०२३ ला पारित केलेल्या टीओआरचे पालन करण्यात येत नाही. तरी जनतेला अंधारातत ठेऊन आपण जनसुनानणी आयोजित करण्यात आलेली असून ती रद्द करण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तकाने माहिती दिली होती की स्पष्टीकरण आधीच दिलेले आहे आणि EIA आणि परिशिष्टांमध्ये पुरेशी माहिती उपलब्ध आहे.

२६) श्री भूषण भोईर -

मी मरीन बायोलॉजिस्ट असून मलासुध्दा काही प्रश्न विचारायचे आहेत. बेसलाईन सर्व्हेचा अर्थ काय होतो, तो आम्हांला सांगावा. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की याचे लिखित उत्तर देण्यात येईल.उपस्थितांना

तोंडी उत्तर देण्याची सूचना केली. श्री व्ही.एन. मोटघरे, सहसंचालक, हवा प्रदूषण नियंत्रण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी सांगितले की प्रत्येक प्रश्नाची नोंद घेण्यात येत आहे. तरी आता मागे बसलेल्यांना बोलण्याची संधी देण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की बेसलाईन डेटा म्हणजे ज्याठिकाणी प्रकल्प स्थापन करण्यात येणार आहे, त्याठिकाणी केलेली मॉनिटरिंग, जी सीएसआयआर-एनआयओने केलेली आहे.

त्यावेळी भूषण भोईर यांनी मत मांडले की मॉनिटरिंग व बेसलाईन डेटा याचा अर्थच वेगळा आहे. चुकीचे उत्तर देऊन पर्यावरण सल्लागार हे फसवणूक आणि दिशाभूल करत आहेत याची नोंद घेण्यात यावी. बेसलाईन डेटा म्हणजे प्रत्यक्ष प्रकल्प स्थानाची पाहणी करणे. येथे सांगण्यात आले की Zoological Survey of India चा आयता डेटा वापरण्यात आलेला आहे.

टीओआर च्या निर्देशांनुसार शासनास प्रकल्प स्थानाचे सर्वेक्षण प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार यांनी करणे अपेक्षित होते, ते सर्वेक्षण प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार यांनी केलेले नाही. पावसाळ्यासोबत हिवाळ्यातही सर्वेक्षण अपेक्षित होते.

दमणहून जेथून माती काढणार आहेत, तेथे बोंबिल माशांचे प्रजनन क्षेत्र आहे. प्रकल्प प्रवर्तक/ पर्यावरण सल्लागार यांनी हिवाळ्यात तेथे सर्वेक्षण केलेले नाही. पावसाळ्यासोबत हिवाळ्यातील सर्व्हेक्षण अपेक्षित होते. मासे हे विशिष्ट कालावधितच गाभण होतात. हिवाळ्यात मासा गाभण होतो, त्याची नोंद न घेण्यासाठीच हिवाळ्यात सर्वेक्षण करण्यात आलेले नाही असे आम्हांला वाटते.

तरी सदरहू सर्वेक्षण अहवाल हा अर्धवट व बेकायदेशीर आहे असे आमचे मत आहे. याची नोंद घेण्यात यावी. नोंद घेण्यात येईल असे आश्वासन श्री व्ही.एन. मोटघरे, सहसंचालक, (हवा प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिले

प्रकल्प प्रवर्तकाने माहिती दिली की अशा संपादनाची सर्व डेटा संपादन आणि तारीख आणि संपादनाचे स्त्रोत प्रत्येक अभ्यास अहवालात उपलब्ध आहेत आणि असा डेटा पर्यावरणीय अभ्यास करण्यासाठी पुरेसा आहे.

२७) श्री लोबो:-

२ जून २०२३ च्या टीओआर मध्ये ८.३ च्या कलमात निर्देशित आहे की Traffic assessment studies for increased traffic due to port related activities on NH 8 and Mumbai Vadodara Express Way. आमचे म्हणणे आहे की हे करण्यात आलेले नाही. याचे कृपाकरुन स्पष्टीकरण देण्यात यावे.

प्रकल्प प्रवर्तकाने माहिती दिली की, डेस्क अभ्यास हा वाढवण बंदराच्या विकासामुळे वडोदरा मुंबई एक्स्प्रेस वेची क्षमता पडताळून पाहण्यासाठी होता आणि अभ्यास पूर्ण झाला आहे आणि 28 जून 2023 रोजी डीटीईपीएला माहिती आधीच सादर करण्यात आली होती. अभ्यासानुसार वडोदरा मुंबई एक्सप्रेस वे वाढवण वाहतुकीची पूर्तता करण्यासाठी पुरेशी क्षमता असेल. अहवाल मागणी संदर्भात नोंद घेण्यात आलेली

आहे असे श्री व्ही.एन. मोटघरे, सहसंचालक, हवा प्रदूषण नियंत्रण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी नोंद घेतल्याचे सांगितले व पुढील प्रश्न विचारण्याची सूचना केली.

श्री लोबो यांनी आक्षेप नोंदविला की जर अहवाल दिला नाही, तर अभ्यासासाठी एक महिन्याची मुदत द्यावी अशी आम्ही मागणी करावी का

श्री लोबो यांनी संबंधित अहवाल त्वरित उपलब्ध करण्याची मागणी केली. अहवाल मागणी संदर्भात नोंद घेण्यात आलेली आहे असे श्री व्ही.एन. मोटघरे, सहसंचालक, हवा प्रदूषण नियंत्रण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी नोंद घेतल्याचे सांगितले व पुढील प्रश्न विचारण्याची सूचना केली.

श्री वैभव अशोक वझे, वाढवण बंदर विरोधी संघर्ष समिती सचीव यांनी येथे आक्षेप नोंदविला की आमच्याकडे सर्व अहवाल आहेत, तर तो अहवाल दाखविण्यात यावा.

त्यावेळी काही उपस्थितांना मागणी केली की नुसती नोंद घेऊन उपयोग नाही, तर अहवाल उपलब्ध करुन द्यावा व एक महिन्याने परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी.श्री व्ही.एन. मोटघरे, सहसंचालक, हवा प्रदूषण नियंत्रण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी नोंद घेतल्याचे सांगितले.

श्री गजानन पागधरे यांनी आक्षेप नोंदविला की जरी आपण बाधित ग्रामपंचायतींना अहवाल उपलब्ध करुन दिलेला आहे. मात्र तेथील मच्छीमार संघ, सोसायटी यांना सदरहू पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल हा उपलब्ध करुन दिलेला नाही. या प्रकल्पामुळे कफपरेड पासून झाईपर्यंत सर्व मच्छिमार समाज हा उध्वस्त होणार आहे. पालघर आणि ठाण्यात ५६ सोसायट्या आहेत. मुंबईला मध्यवर्ती संघ आहे. कुठल्याच मच्छिमार संघास, सोसायटीला ईआयए अहवाल उपलब्ध करुन देण्यात आलेला नाही. तरी सर्व मच्छिमार संघ, सोसायटी यांना ईआयए अहवाल उपलब्ध करुन द्यावा व नंतर ही जनसुनावणी आयोजित करण्यात यावी. याचे उत्तर देण्यात यावे. हा गोल्डन बेल्ट आहे. जिल्ह्यातील सर्व मच्छिमार येथे मासेमारीसाठी येतात, त्या व्यवसायावर विपरित परिणाम होणार आहे.

श्री मिलिंद राऊत यांनी मत व्यक्त केले की या प्रकल्पाचा फटका सर्व मच्छीमारांना बसणार आहे, त्यांना ईआयए अहवाल उपलब्ध करून दिला नाही तर ही जनसुनावणी घेण्याचा अर्थ काय, हे मूलभूत हक्कांचे उल्लंघन आहे. हा अहवाल अभ्यासासाठी उपलब्ध करून द्यायचा नसेल तर ही जनसुनावणी हा फार्स बंद करण्यात यावे.

माहिती उपलब्ध करून दिल्यानंतर महिनाभरात जनसुनावणी घेण्याचे आश्वासन देत आहात का, असा सवाल श्री.लोबो यांनी केला. श्री व्ही.एन. मोटघरे, सहसंचालक (हवा प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी सांगितले की, स्थानिकांनी उपस्थित केलेल्या शंका व हरकतींची नोंद घेतली जात असून ते पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालयाला सादर केले जातील. त्या संदर्भात तज्ञ समिती पुढील योग्य ती कार्यवाही करते.श्री. लोबो यांनी आक्षेप घेतला की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सर्व अहवालांची पडताळणी करून जनसुनावणी घेणे अपेक्षित होते.

२८) श्री वैभव अशोक वझे, वाढवण बंदर विरोधी संघर्ष समिती सचिव, यांनी आक्षेप नोंदविला की समस्यांबाबत आम्ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला ०९ जानेवारी २०२४ रोजी पत्र लिहिले आहे. त्याचा पुरावा आमच्याकडे आहे .महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने या प्रकरणाचा संपूर्णपणे विचार करून जनसुनावणी पुढे ढकलण्याची प्रक्रिया पुढे नेणे अपेक्षित होते.तसेच जिल्हाधिकाऱ्यांनाही या प्रकरणाची माहिती देण्यात आली.

तसेच, EIA अधिसूचना, 2006 नुसार, जनसुनावणीच्या ठिकाणाबाबतही आक्षेप घेण्यात आले आणि प्रस्तावित प्रकल्पाच्या ठिकाणी जनसुनावणी घेण्याची विनंती करण्यात आलेली होता. प्रकल्प प्रवर्तकाने उत्तर देताना अहवाल कोणाला उपलब्ध करून द्यायचा याची माहिती देताना, प्रकल्पाच्या १०.०० किमी आणि प्रभावित गावांमध्ये मूल्यांकनासाठी EIA अधिसूचना, 2006 अंतर्गत या संदर्भात काही मार्गदर्शक तत्त्वे आहेत. प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण दस्ताऐवज परिघातील सर्व बाधित ग्रामपंचायत कार्यालयांना इंग्रजी आणि मराठीत उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

त्यावेळी कुलाब्यापासून झाईपर्यंत सर्व मच्छिमारांना उद्ध्वस्त करणाऱ्या कफ परेडचा विचारच झाला नाही, असा आक्षेप काही उपस्थितांनी एकत्रितपणे घेतला. आमच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होणार आहे

त्यावेळी श्री राऊत म्हणाले की, ईआयए अहवालात बाधितांची संख्या केवळ वीस हजार आठशे इतकीच लिहिली आहे. लाखो मच्छिमार बाधित/उद्ध्वस्त होणार असतील, तर बाधितांची संख्या जाणूनबुजून लपवली जात असेल, तर अहवाल खोटा, दिशाभूल करणारा आहे आणि अपूर्ण अहवाल असताना स्थानिकांना जनसुनावणीला का सामोरे जावे लागते हा आमचा मूळ प्रश्न आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने चुकीच्या अहवालावर जनसुनावणी का आयोजित करावी? त्यावेळी श्री व्ही.एन. मोटघरे, सहसंचालक (हवा प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी नमूद केले की परत परत तेच मुद्दा उपस्थित केला जात आहे.

**२९) श्री संतोष कोळी, दर्यावर्दी मच्छिमार सहकारी सोसायटी:-**

आम्हांला मुंबईतून मासेमारीचा परवाना दिला जातो. त्यावर 'महाराष्ट्र मरीन झोन' मध्ये मासेमारीला परवानगी आहे. मुंबई, कुलाबा येथून आमच्या बोटी या सोनेरी पट्ट्यात मासेमारीसाठी येतात.जर सरकार आम्हाला "महाराष्ट्र सागरी क्षेत्रात" मासेमारी करण्यास परवानगी देत असेल तर आम्ही फक्त १० किलोमीटरच्या आत मासेमारी का करणार?. तुम्ही परिघातील लोकांनाच पर्यावरणीय अहवाल कसे उपलब्ध करू शकता, मग आम्ही मासेमारीला कोठे जायचे?

मग आम्ही होडी बुडवून देशोधडीला जावे का? मग आमच्या मुंबईतील मच्छिमारांना का कळविले नाही? हा प्रकल्प आम्ही होऊ देणार नाही.

३०) स्थानिक मच्छिमारासोबत बोटीने सर्वेक्षण करण्यासाठी आमच्यासोबत यावे, आमच्यासोबत बोटीवर दोन रात्री घालवाव्यात आणि नंतर अहवाल तयार करावा, असे सुचवले.

३१) जनसुनावणीच्या वेळी जनतेला संपूर्ण माहिती असायला हवी, असा आक्षेप स्थानिकांनी घेतला. माहिती उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. जनतेच्या पैशाने एवढा मोठा मंडप उभारला, एवढी मोठी पोलिसफौज आणली. आम्ही स्वखर्चाने जनसुनावणीला आलो, कागदपत्रांची पूर्तता करावी.

श्री व्ही. एन. मोटघरे, सहसंचालक (हवा प्रदूषण नियंत्रण) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी सांगितले की अहवालाचा अभ्यास करण्यासाठी पुरेसा वेळ देण्यात आलेला होता, सदरहू सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे.

**३२) श्री गजानन मोरेश्वर पागधरे, माहिम, मुंबई:-**

जनसुनावणी अधिकाऱ्यांचा प्रश्न आहे; ते गावातील लोकांच्या अस्तित्वाशी संबंधित आहे. माहीम-वांद्रे येथे केवळ 50 एकर जमीन भरली. दुसरीकडे पाण्याची पातळी वाढल्याने दादरची चौपाटी वाहून गेली. त्यामुळे बंदर विस्तारासाठी पाच हजार एकर जागा भरली तर ते पाणी आमच्या गावांमध्ये मुरेल आणि आम्ही विस्थापित होऊ. त्यासाठी काय योजना आहे? पाच हजार हेक्टर भरल्यानंतर दुसऱ्या बाजूला पाण्याची पातळी वाढणार, प्रकल्प प्रवर्तकांचे काय नियोजन? यावेळी एका व्यक्तीने उपस्थितांना आवाहन केले की, स्थानिकांना संपूर्ण माहिती नाही, अहवाल पूर्ण नाही, मात्र मा. राष्ट्रपतींना विनंती आहे की ही जनसुनावणी पुढे ढकलून पुढील तारीख जाहीर करावी

येथे पर्यावरण विषयक जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांनी आवाहन केले की, फक्त एका कंपार्टमेंटमधीलच लोकांनी बोलावे आणि इतरांना बोलू द्यावे .प्रत्येकाला बोलण्याची संधी दिली जाईल, असे मी वारंवार सांगितले आहे.मात्र, प्रस्तावित प्रकल्पाबाबत काही पर्यावरणविषयक सूचना, हरकती असल्यास त्या नोंदवाव्यात.त्याची नोंद घेतली जाईल आणि इतिवृत्तांमध्ये समाविष्ट केली जाईल.हा अहवाल भारत सरकारला सादर केला जाईल.तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल .

श्री व्ही.एन. मोटघरे, सहसंचालक, हवा प्रदूषण नियंत्रण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी पुन्हा पुन्हा सांगितले की स्थानिकांनी उपस्थित केलेले प्रश्न ,आक्षेप नोंदविण्यात येत असून ते सर्व पर्यावरण , वने व हवामान बदल मंत्रालय यांना सादर करण्यात येणार आहेत .त्याबाबत तेथील तज्ज्ञ समिती पुढील योग्य ती कार्यवाही करते .श्री लोबो यांनी आक्षेप नोंदविला की महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी सर्व अहवाल तपासूनच जनसुनावणी आयोजित करणे अपेक्षित होते .

३३) डॉ गजेंद्र भांजी -

स्थानिकांना उपलब्ध केलेले अहवाल अर्धवट, चुकीचे आहेत.आधी ते अहवाल पूर्ण करून नंतर स्थानिकांना उपलब्ध करून द्यावेत.त्याचा अभ्यास करण्याराठी स्थानिकांना पुरेसा वेळ द्यावा. कोणत्याही परिस्थितीत विस्तारीकरण बंदर प्रकल्प रद्द करावाच लागेल. येथे श्री व्ही.एन.मोटघरे, सहसंचालक (हवा प्रदूषण नियंत्रण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी इतरांना बोलण्याची संधी द्यावी, असे आवाहन केले.

अर्धवट अहवाल असल्याने जनसुनावणी रद्द करण्याची मागणी केली असता सर्वांनी हात वर करून पाठिंबा दिला. डॉ.गजेंद्र भानजी म्हणाले की, पर्यावरणविषयक जनसुनावणी समितीने लोकांच्या भावना जाणून घेतल्या असतील. मात्र ही जनसुनावणी रद्द करून स्थानिकांनी सांगितल्यानंतरच घेण्यात यावी.

३४) एडव्होकेट राहूल दिनेश ठाकरेः-

स्थानिकांना जाणीवपूर्वक पूर्ण आणि योग्य कागदपत्रे उपलब्ध करून दिली नसतील तर तुम्ही सरकारी प्रक्रियेत कसे पुढे जाऊ शकता? खोटी, अपूर्ण माहिती देणे हा गुन्हा असला तरी त्या खोट्या खोट्या अहवालावर सरकारी प्रक्रिया राबवणे पूर्णपणे चुकीचे आहे. त्यावेळी श्री व्ही.एन .मोटघरे, सहसंचालक, (हवा प्रदूषण नियंत्रण(, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ म्हणाले की, तुम्ही उपस्थित केलेल्या सूचना, हरकतींची नोंद घेण्यात आली असून नोंदणी केलेल्यांवर इतर व्यक्तींवर दबाव आणू नये .तुम्हाला तसेच इतर कंपार्टमेंटमध्ये उपस्थित असलेल्यांना सूचना, हरकती नोंदवण्याची संधी दिली जावी

३५) श्री संतोष कोळी, मढ दर्यावर्दी मच्छिमार सहकारी सोसायटीः-

ते सभेत म्हणाले की, जिल्हाधिकारी म्हणतात इतरांना बोलण्याची संधी द्या, पण तुमच्या प्रतिनिधींनी इथे अभ्यास केला असेल, तर तुमच्या प्रतिनिधींना बोलू द्या, याला सर्वांचे समर्थन आहे का, असे विचारले असता सर्वांनी हात वर केले. त्याचवेळी कामगार संघटनेचे श्री.लोबो म्हणाले की, येथे लोकप्रतिनिधी आले असून त्यांनाही बोलायचे आहे.

३६) माननीय आमदार विनोद निकोले , डहाणू विधानसभाः-

वाढवण बंदराच्या निमित्ताने या बैठकीत विविध मच्छिमार संघ, सोसायट्या यांच्या पदाधिका-यांनी बरेच मुद्दे, विचार, आक्षेप उपस्थित केलेले आहेत. कष्टकरी संघटनेचे ब्रायन लोबो, डहाणू मच्छिमार समितीचे प्रतिनिधी, श्री वझे, वाढवण बंदर विरोधी संघर्ष समिती यांनी तांत्रिक मुद्दे मांडलेले आहेत.भूषण भोईर यांनीसुध्दा मुद्दे मांडलेले आहेत. ही जनसुनावणी स्थानीक लोकांच्या भावना कळण्यासाठी आहे. येथील मच्छिमार बांधव, आदिवासी बांधव व इतर हे कोणत्याही जाती धर्माचे असतील, ते येथील भूमीपुत्र आहेत. त्या सर्वांनीच आक्षेप नोंदविलेला आहे की प्रकल्प प्रवर्तकांनी उपलब्ध केलेला पत्रव्यवहार, अहवाल हा परिपूर्ण नाही. तर एवढा जनसमुदाय जर सांगतो ही अहवाल परिपूर्ण नाही व सर्वजण पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही रद्द करुन सर्व कागदपत्रे उपलब्ध करुन द्यावीत. सर्वांचे म्हणणे आहे की जनसुनावणी ही

आपण थांबवावी व नंतर पुढ घ्यावी. तर त्याप्रमाणे कार्यवाही करावी. माझ्या सोबत विक्रमगडचे माननीय आमदार सुनील भुसारासाहेब असून ते त्यांचे मत मांडतील.

**३७) माननीय आमदार सुनील भुसारा, विक्रमगड मतदारसंघ:-**

आमदार विनोद निकोले यांनी सांगितल्याप्रमाणे माझी प्रशासनास विनंती आहे की जनतेच्या भावना लक्षात घेऊन आपण उपलब्ध केलेली माहिती ही अपूर्ण आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांना अपेक्षित असलेली पत्रे, अहवाल त्यांना अपूर्ण मिळालेला आहे. जर जनतेचा तसा आग्रह आहे, मराठीच्या भाषांतराबाबतही त्यांना आक्षेप व नाराजी व्यक्त केलेली आहे. तर आपण करत असलेला अट्टाहास थांबवावा, लोकांना जे अपेक्षित आहे, तेच शासनाने केले पाहिजे. मा. मुख्यमंत्र्यांची भूमिका जनतेला जे अपेक्षित आहे, तेच करण्याची आहे. जनतेला जे पाहिजे, तेच आपण केले पाहिजे. तरी ही जनसुनावणी त्वरित थांबविण्यात यावी. लोकांना आवश्यक असणारी पत्रे,दस्तावेज उपलब्ध करुन देण्यात यावा व नंतर जनसुनावणी घेण्यात यावी.

श्री व्ही.एन. मोटघरे, सहसंचालक, हवा प्रदूषण नियंत्रण, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी सांगितले की आपण केलेल्या सूचनांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल व पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येईल.

स्थानिक मच्छिमार यांनी येथे आक्षेप घेताना ही सभा अध्यक्ष चालवत असताना इतरांनी तावा घेऊ नये असे मत मांडले.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले सन्माननीय लोकप्रतिनिधी, स्थानिक पदाधिकारी व इतर यांनी आक्षेप नोंदविलेला आहे की प्रकल्प प्रवर्तकांनी उपलब्ध केलेला दस्तावेज अपूर्ण आहे, तर प्रकल्प प्रवर्तकांचे म्हणणे आहे की त्यांनी कायद्यांतील तरतुदींचे पालन केलेले आहे. या मुदद्यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल. भारत सरकारची तज्ज्ञ समिती त्याबाबत निर्णय घेईल.

यावेळी मा. आमदार सुनील भूसारा यांनी आक्षेप नोंदविला येथील सर्व सन्माननीय आमदार व जिल्हाधिकारी यांची एक ऑनलाईन बैठक झालेली होती, त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी सर्व लोकप्रतिनिधींची एक अजून बैठक घेण्याचे आश्वासन आणि या प्रकल्पामुळे जनतेच्या अडीअडचणी समजून घेणार होतात. त्याचबरोबर या प्रकल्प संदर्भातील सर्व कागदपत्रे जिल्हाधिकारी हे उपलब्ध करुन देणार होतात. ती बैठक झालेली नाही व माहितीसुध्दा आम्हांला मिळालेली नाही. त्यामुळे बैठकीबाबत जनतेची मागणी ही मान्य करायला पाहिजे. लोकांच्या भावना लक्षात घेऊन ही जनसुनावणी येथेच थांबवावी अशी मी आपणास विनंती करतो, कारण या संदर्भाबाबत आपण मान्य केलेली बैठक घेतलेली नाही. येथील सहाही आमदार व येथील खासदार उपस्थित होते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कायद्यातील तरतुदी पूर्ण करण्यात आलेल्या आहेत. मा. मुख्यमंत्र्यांकडे याबाबत एक बैठक झाली, त्या बैठकीच्या निर्देशांप्रमाणे सर्व कायदेशीर तरतुदी पाळण्यात आलेल्या आहेत. बैठकीत निर्देश दिल्याप्रमाणे स्थानीकांना मराठी अहवाल ही उपलब्ध करुन देण्यात आलेला होता. काल बैठक आयोजनाबाबत मा. उच्च न्यायालयात एक याचिका दाखल होती. मा. उच्च न्यायालयानी दिलेले सर्व निर्देश पाळण्यात येत असून ही जनसुनावणी प्रक्रिया चालू

आहे. बैठकीत कूठल्याही व्यक्तीने उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येत आहे. त्याची इतिवृत्तात नोंद घेण्यात येऊन ते भारत सरकारला सादर करण्यात येईल. त्याबाबत. सर्व नियम पाळण्यात येत आहेत. स्थानिकांनी अपुरी माहिती उपलब्ध केल्याचा आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृत्तात समावेश करण्यात येणार आहे.

येथे आमदार श्री विनोद निकोले यांनी मत मांडले की अध्यक्षमहोदय यांनी इतर लोकांना बोलावे असे म्हणतात, मग जर दस्तावेज सर्व माहितीसह लोकांना उपलब्ध झालेले नाहीत, तर लोक मुद्दे कसे उपस्थित करु शकतील.

अध्यक्ष यांनी सांगितले की कृपया लोकांनी बोलू नका असा दबाव आणण्यात येऊ नये. येथे प्रत्येकास बोलण्याची संधि देण्यात येत आहे.

आमदार श्री सुनील भुसारा म्हणाले की, सभेत लोकांनी सांगितले की आमचे काही लोकप्रतिनिधी आमच्या बाजूने बोलतील, संबंधित व्यक्तीने बोलावे असा दबाव प्रशासनाने आणू नये. संस्थेचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी बोलले, त्यांचे म्हणणे ऐकले, रेकॉर्ड केले, असे अध्यक्षांनी सांगितले. पण इतरांनाही बोलण्याची संधी दिली पाहिजे.

३८) श्री स्वप्नील आशादीपक तरे, लोकप्रहार सेना, राहणार-सफाळा, तालुका, जिल्हा पालघरः-

प्रकल्प प्रवर्तक जेएनपीए कडून उत्तर मिळालेले आहे की जनसुनावणी नंतर मागणीनुसार विविध पत्रे, सर्वेक्षण अहवाल उपलब्ध करण्यात येईल याचा अर्थ सर्वेक्षण हे अपूर्ण आहे. ही जनसुनावणी ईआयए अधिसूचना २००६ नुसार जनतेसाठी आयोजित करण्यात आलेली आहे. मात्र अपूर्ण अहवालावर जर जनसुनावणी आयोजित करण्यात येत आहे, तर ईआयए अधिसूचना, २००६ चे उल्लंघनच स्वतः जिल्हा प्रशासनन करत आहे. तरी प्रथम पूर्ण असलेला दस्तावेज उपलब्ध करुन देण्यात यावा, नंतरच जनसुनावणी ही आयोजित करण्यात यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ईआयए अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण दस्तावेज बाधित गावाच्या ग्रामपंचायतीस उपलब्ध करुन दिलेला आहे. मा. मुख्यमंत्र्यांच्या आदेशानुसार अतिरिक्त दस्तावेज - अहवाल मराठीत उपलब्ध केलेला असून जर अजून काही आवश्यक असेल,तर तेही उपलब्ध करण्यात येईल. अध्यक्ष यांनी प्रतिपादन केले की सदरहू जनसुनावणी समिती ही आपले विचार, सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप शासनास पोहचविण्याचे एक माध्यम आहे.

३९) स्थानिक व्यक्ती - मच्छिमार व्यक्ती यांनी विचारणा केली की जर अपूर्ण अहवाल पूर्ण करुन स्थानिकांना उपलब्ध करुन दिल्यास आपण परत जनसुनावणी आयोजित करणार काय, याचे स्पष्टीकरण जिल्हाधिकारी यांनी द्यावे. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपली सूचना, आक्षेप भारत सरकारला सादर करण्यात येतील.

स्थानिक व्यक्ती यांनी सांगितले की आमच्या मच्छिमार संघ, विविध सोसायटी यांना अहवाल मिळालेला नाही, तर तो उपलब्ध करुन दिल्यानंतर अभ्यासासाठी पुरेसा अवधी देऊन जनसुनावणी परत आयोजित करण्यात यावी. ही जनसुनावणी त्वरित थांबविण्यात यावी.

अध्यक्ष यांनी सांगितले की सकाळी ११.०० वाजल्यापासून जनसुनावणी प्रक्रिया ही मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार चालू असून लोकप्रतिनिधी, विविध मच्छीमार संघाचे प्रतिनिधी, स्थानीक यांनी सूचना, आक्षेप मांडले असून त्याची नोंद घेण्यात आलेली आहे. इतिवृत्तात प्रत्येक बाबींची नोंद घेण्यात येईल आणि ते भारत सरकारला सादर करण्यात येईल.

**४०) श्री धनाजी पाडुरंग कोळी,**

तांत्रिक बाबतीतील सर्वेक्षण हे पूर्णपणे अपयशी झालेले आहे. येत्या २२ जानेवारीला रामराज्य येणार आहे.ज्या रामाने सावत्र आई कैकयीसाठी वनवास पत्करला, एका धोब्याच्यामुळे आपल्या पत्नीस सतीसावित्री सिद्ध करण्यासाठी दंडित केले, तर येथे एवढे लोक जमा झालेले दिसत नाही काय? तरी जिल्हाधिकारी यांनी भारत सरकारला कळवावे की स्थानिकांना वाढवण बंदर नाही पाहिजे

**४१) श्री मिल्टन सौदिया, राहणार-वसई, जिल्हा-पालघरः-**

मा. जिल्हाधिकारीसाहेब,आता स्वप्नीलने जो मुद्दा मांडला आणि आपण उत्तर देताना सांगत आहात की माहिती न दिल्याची नोंद घेतलेली आहे.तसे न होता माहिती प्रकल्पग्रस्तांच्या भाषेत दिलेली नाही अशी नोंद करण्यात यावी. हा प्रकल्प महाराष्ट्रात स्थापन होत आहे, महाराष्ट्राची राजभाषा ही मराठी आहे आणि प्रकल्पग्रस्तांना समजेल अशा सुलभ मराठीत प्रकल्पाचा सर्व दस्तावेज उपलब्ध करण्यात यावा. गुगल मराठी नको, कारण Nature of Port चे भाषांतर बंदराचा निसर्ग असे करत असतील, तर त्याबाबत लक्ष देणे.

**४२) श्री अनिकेत पाटील, राहणार-वरुर,वाढवण बंदर युवा संघर्ष समितीचा प्रतिनिधीः-**

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपण मा. मुख्यमंत्र्याच्या निर्देशांप्रमाणे जनसुनावणीचे काम चालू आहे असे सांगितले. त्या बैठकीस मी उपस्थित होतो, आपण कौटुंबिक कार्यक्रमामुळे उपस्थित नव्हता. त्या बैठकीत मा.मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट आदेश दिलेले होते की, मच्छिमारांच्या सर्व मागण्यांचा किंवा मच्छिमारांची जी माहिती आहे, ती पूर्ण झाल्याशिवाय आपण पुढे जाऊ नये. जर पुढे जाऊ नका असा स्पष्ट आदेश असतानाही ही जनसुनावणी आपण का आयोजित केलेली आहे? ही हूकूमशाही पध्दतीने लादलेली जनसुनावणी आहे.अपूर्ण माहितीच्या आधारे जर जिल्हाधिकारी जनसुनावणी आयोजित करत असतील, तर हे प्रशासनाचे अपयश समजायचे का हे आपण सांगावे.

पर्यावरण जनसुनावणी समितीचे अध्यक्ष म्हणाले की, EIA अधिसूचना, 2006 नुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी बाधित गावांच्या सर्व संबंधित ग्रामपंचायतींना सर्व संबंधित वैज्ञानिक अहवालांसह पर्यावरण दस्तऐवज उपलब्ध करून दिले आहेत. मा. मुख्यमंत्री, साहेबांच्या निर्देशानुसार. अतिरिक्त कागदपत्रे आणि अहवाल मराठीत उपलब्ध करून देण्यात आले असून, काही हवे असल्यास तेही उपलब्ध करून दिले जातील.

४३) **श्री अशोक भीमा अंबिरे, गाव-धाकटी डहाणू, तालुका डहाणू, जिल्हा पालघरः-**

मी क्रियाशील मच्छिमार आहे.अजूनही मी बोटीमध्ये जातो,माझा मुलगा जातो. माझा नातू जातो. आमच्या तीन पिढ्या अजूनही मच्छिमारीला जातात.मी डीपीआरचा अहवाल वाचलेला आहे त्यामध्ये अनेक त्रुटी आहेत बाधित गावे अनेक असताना कमी बाधित गावे दाखविलेली आहेत. सर्व बाधित गावांचा समावेश अहवालात आवश्यक होता, ती महत्वाची त्रुटी आहे. सहा सोसायट्या दाखविल्या, प्रत्यक्ष आठ आहेत. इतर अनेक त्रुटी आहेत. मी स्वतः क्रियाशील मच्छिमार असल्यामुळे जर वाढवण बंदर झाले, तर संपूर्णपणे आमची मच्छिमारी बंद होईल.मी सगळयांना सांगतो की की कृपया कुठलेही राजकारण आणू नका. ज्यादिवशी राजकारण येईल, त्या दिवशी वाढवण बंदर झाल्याशिवाय राहणार नाही. म्हणून येथे उपस्थित राजकीय लोकांना प्रश्न विचारायचा आहे की जेव्हा तुम्ही स्वतःला आमदार म्हणून मिरवतात, मग अधिवेशनात का प्रश्न उपस्थित केलेला नाही. येथे प्रश्नाचे उत्तर द्यायचे नाही, येथे लोकांना दाखवायला येतात,हा दुटप्पीपणी चालणार नाही.आम्ही मच्छिमार लोक देशोधडीला लागतात. राजकारणी लोक हे राजकारण करतात.मी मच्छिमार म्हणून जगेन,मच्छिमार म्हणून मरेन जे जाणार आहे, ते मच्छिमाराचेच जाणार आहे. मी क्रियाशील मच्छिमार आहे, क्रियाशील शेतकरीही आहे. माझे शिक्षण एम.ए.बी.एड आहे. माझा मुलगा बारावी पास आहे, नातवाने आय.टी.आय पास झालेला असून आम्ही तिघेही बोटीवर जातो. आमच्या तीन पिढ्या सतत दहा दिवस बोटीवर होतो. केवळ मच्छिमार धंद्यावर आम्ही जगत आहोत. तरी मी शासनास आणि जिल्हाधिकारी यांना विनंती करतो की अजूनही या अहवालाचा अभ्यास करा व जनसुनावणी नंतर लावा.

येथे उपस्थित आमदार विनोद निकोले यांनी सांगितले की मी व सुनील भूसारा यांनी विधानसभेच्या पायरीवर बसून प्रकल्पाच्या विरुध्द घोषणा दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे लक्षवेधी लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. आम्ही राजकारण करत नाही, भले आम्ही परत निवडून आलो नाही तरी चालेल, पण हा राजकारणाचा विषय नाही.

४४) **स्थानीक मच्छिमार व्यक्ती -** अध्यक्ष महोदय, आपण या सभेचे अध्यक्ष असून शासकीय अधिकारी व आम्ही स्थानीक जनता यांचे ऐकून ख-या अर्थाने न्याय देणारे आहात. आपण मच्छिमार आयुक्त होता, आपणास मच्छीमारांचे प्रश्न माहित आहेत. बुलेट ट्रेनची दोन वेळी जनसुनावणी ही थांबविण्यात आली, कारण कागदपत्रे अपूर्ण होते. येथेही अहवाल अपूर्ण आहे, तर आपण जनसुनावणी थांबविण्याचा निर्णय द्यावा. तरी आपण जनसुनावणी त्वरित थांबवून सर्व कागदपत्रांची पूर्तता झाल्यानंतर जनसुनावणी परत घ्यावी.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की या प्रश्नाचे उत्तर पूर्वीही दिले गेलेले आहे. आपण जे बोलले ते सर्व बैठकीच्या इतिवृताचा भाग होणार आहे. तरी तोच तोच मुद्दा उपस्थित करण्यात येऊ नये. तसेच दुसरी बाब म्हणजे ही केवळ पर्यावरणविषयकच जाहिर जनसुनावणी आहे. मच्छिमार पुनर्वसन वा इतर विषय यासाठी वेगळे व्यासपीठ आहे. शासनाचे सक्षम अधिकारी त्याबाबत योग्य तो निर्णय घेतील. अध्यक्ष यांनी महिलांना काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

४५) सौ. आशा राजन माच्छी , स्थानिक महिला -

आपण म्हणता प्रश्न विचार, उत्तर देऊ, मग जे प्रश्न विचारले, त्याचे अजूनही उत्तर दिलेले नाही. तर आम्हांला विचारलेल्या प्रश्नांना तोंडी उत्तरे पाहिजेत व त्यांची नोंद घेण्यात यावी. आम्ही शिकलेलो नाही. पण आम्हांला उत्तरे मिळाली पाहिजेत. प्रत्येक प्रश्नाला उत्तर हे मिळालेच पाहिजे.

४६) श्री विकास मडवे, संघर्ष समितीचा कार्यकर्ता, पाडव ग्रामपंचायत-

येथे एक गोष्ट स्पष्ट दिसत आहे जरी शासनाकडे आयएएस, आयपीएस सारखी कुमक असली तरी जनतेसमोर आपला अभ्यास कमीच पडतो.या जनसुनावणीत प्रशासनाने आमच्यापेक्षा दहापट अभ्यास जास्त करुन येणे अपेक्षित होते,तसे दिसत नाही.जनसुनावणीची तारीख घोषित झाल्यापासून आम्ही जिल्हाधिकारी कार्यालय-पालघर आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्याशी पत्रव्यवहार करत आहोत.

या जनसुनावणीत मला एक विषय मांडायचा आहे, येथे प्रकल्पाचे समर्थकांनी ऐकून घ्यावे. वाढवण बंदर विकासामुळे पर्यावरण व भौगोलिक बदल मोठ्या प्रमाणावर होणार आहे. जेथे हे बंदर उभारण्यात येणार आहे, तेथील तीस गावांचा पाण्याचा स्त्रोत हा भूगर्भ, तलाव व नदी आहे.

बंदर उभारणी होत असताना मोठ्या प्रमाणात उत्खनन होईल,त्यामुळे भूपृष्ठावरिल आणि भूगर्भातील पाण्याच्या स्त्रोतावर निश्चितच दुष्परिणाम होणार आहे. याबाबत कुठलाही अभ्यास अहवालात आणि सादरीकरणात दर्शविलेला नाही. तरी याबाबत सर्वेक्षण करुन तपशीलवार माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी

तसेच भूगर्भातील पाणी, झरे आणि समुद्र हे एकमेकाशी जोडलेले (interconnected) असतात. जेव्हा समुद्रात ड्रेजिंग/उत्खनन करणार तेव्हा त्याचा प्रत्यक्ष परिणाम तेथील भूगर्भातील जलसाठ्यांवर होतो. म्हणजे समुद्रात ड्रेजिंग/उत्खनन केल्यानंतर परिसरातील भूगर्भातील जलसाठा हा खारट होईल किंवा जलस्त्रोतात अटकाव होईल.

त्यामुळे प्रस्तावित प्रकल्प परिसरातील जनता पाण्याच्या दुर्भिक्षामुळे मरेल किंवा सोडून जाईल. म्हणून अहवालात पुनर्वसन करावे लागणार नाही असे लिहिलेले आहे. आमचे पिण्याचे पाणी प्रकल्पासाठी घेणार व आम्हांला पाण्याशिवाय मारण्याचे षडयंत्र आहे असे आम्ही का मानू नये. या प्रश्नावर उत्तर देण्यात यावे. नंतर प्रकल्प आमच्या परिसरातील पाण्याचा उपसा करणार, ते संपले की नंतर प्रकल्प आम्हांला मिळणारे पिण्याचे पाणी वापरणार.

अन्याय होणारे बंदर आम्ही आमच्या माथ्यावर लादून देणार नाही आमची जनता ही अडाणी असली, तरी सर्व ताकदीनिशी उतरलेली आहे. तरी प्रशासनाने याबाबत पूर्ण अभ्यास करुन परत जनतेशी सामना करा, जनसुनावणी परत आयोजित करा

**प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पर्यावरणाच्या निकषांनुसार भूगर्भातील पाणी बांधकामासाठी वापरले जाणार नाही, असे नमूद केलेले आहे. तथापि, प्रकल्प प्रवर्तकांनी बंदराच्या कामकाजासाठी तसेच बंदरातील (टाउनशिप) रहिवाशांना आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र जीवन**

प्राधिकरणाशी संपर्क साधला MJP, महाराष्ट्र सरकार त्यानुसार अशा मेगा पोर्टसाठी तरतुदी करण्यासाठी प्रकरण अभ्यासत आहे.

**४७) श्री प्रदिप भाऊराव पागधरे, राहणार-नवापूर, स्थानिक मूळ निवासी कोळी,मच्छिमार जमात, लोकअधिकारी अध्यक्षः-**

२०२० पासून पंधरा निवेदने दिलेले आहेत, पण जिल्हाधिकारी कार्यालय सांगते एकही निवेदन प्राप्त नाही. पंधरा निवेदने देताना आम्ही जेएनपीए, मेरीटाईम बोर्ड व जिल्हाधिकारी कार्यालयांना पार्टी केलेले आहे. तुम्ही एकही उत्तर न देता आम्हांला खोटे सांगण्यात येते. मेरीटाईम बोर्डाला गेलो, त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी सांगीतले की आमचा व बंदराचा काहीही संबंध नाही. त्यांना सांगितले की फाईलवर लिहून द्या, त्यावेळी जिल्हाधिकारी यांनी सांगितले की हे २५ वर्षे येत आहेत. जेएनपीए व जिल्हाधिकारी कार्यालय हे संगनमताने काम करत असतात. मी सर्व उच्चपदस्थांना आपले कारनामे चाळीस पाने पत्रे पाठविली आहेत. मी पंतप्रधानांना पत्र पाठविलेले आहे. ग्रामपंचायतीचे ठराव पाठविलेले आहेत

४८) राजश्री प्रकाश भानजीः-

मागे बसलेल्या दहा हजार महिला आहेत, त्या गेले एक महिना तयारी करत आहेत, त्या तशाच बसलेल्या आहेत. मात्र त्यांना संधी देण्यात आलेली नाही. त्या घर चालविणा-या महिला आहेत. हा विकास करण्याचा अधिकार कोणी दिला, हा कोणाचा विकास-परप्रांतीयांचा का कोणाचा विकास आहे. यामुळे आमच्या समुद्राची नासाडी होणार आहे. कांदळवनाची कत्तल करत आहेत. मुंबई गेली, महाराष्ट्र गेला. आज आमची समुद्रशेती आहे. त्यावर हल्ला करण्याचा अधिकार कोणी दिला. आमची समुद्रशेती वाचली, तर आम्ही वाचू.आज सर्व कोळी वाड्यांची नासाडी झालेली आहे. सर्व कोळीवाडे हे नष्ट होतील. जर देश चालवायचा असेल, तर शेतकरी आणी मत्स्य शेतक-यांना वाचवा. घर चालेल, देश चालेल. आम्हाला वाढवण बंदर नको आहे. सर्व उपस्थितांनी वाढवण विरोधात घोषणा दिल्या.आमची निर्णय ठाम आहे, नाहीतर मोठे आंदोलन अधिका-यांविरुध्द उभे करण्यात येईल.

४९) श्री मिलिंद वैद्यः-

वैठक सुरु होताना मा.जिल्हाधिकारी यांनी सांगितले की पर्यावरण विषयावरच उत्तरे देण्यात येतील. पण समजा प्रकल्प झाल, तर जे विस्थापित होणार आहेत, त्यांच्यावरील अन्यायाबाबत कोण उत्तरे देणार आहेत. येथे एका स्थानीकाने सांगितले की जर बंदरच होणार नाही, तर विस्थापित होण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री वैद्य यांनी पुढे सांगितले की या पालघर जिल्ह्यातील बहुतांश गांवे ही समुद्रकिना-यावर वसलेली आहेत. वहुतांशी समाजाचा सागराशी निगडीत व्यवसाय आहे. पालघर जिल्ह्यातील एमआयडीसीतील ऑईल व पाणी हे समुद्रात जात असल्याने संपूर्णतः उच्छेळी, दांडी, घिवली या गावांतील मासेमारी प्रदूषित पाण्यामुळे वंद पडलेली आहे. आजपर्यंत तेथील पाणी हे स्वच्छ करू शकलेलो नाहीत. त्या गावातील मच्छिमारांच्या धंद्यावर गदा आलेली आहे. या बंदरामुळे मोठी जहाजे येतील, त्यामुळे त्याठिकाणी असलेल्या माशांची प्रजनन स्थाने ही नष्ट होतील. मच्छिमार समाज देशोधडीला लागेल.

आजपर्यंत तेथील पाणी स्वच्छ झालेले नाही. त्या गावातील मच्छीमारांचा व्यवसाय ठप्प झालेला आहे. या बंदरात मोठी जहाजे आणली जातील, ज्यामुळे तेथील मत्स्य प्रजनन स्थळे नष्ट होतील. मासेमारी करणाऱ्या मंडळींना जमिनीचा शोध घ्यावा लागणार आहे.या बंदरामुळे गेजर पोर्ट एक्ट जर लागू झाला, तर त्यामुळे तेथील शेती, घरे, जमीनी गावर गदा येणार आहे. तरी गेजर पोर्ट एक्टबाबत खुलासा करण्यात यावा.

श्री राऊत म्हणाले की, आमच्या तीन कार्यकर्त्यांना पोलिसांनी पकडले आहे. त्यावर तोडगा निघाल्याशिवाय सभा चालू देणार नाही. सरकारने अवलंबलेले दबाव तंत्र त्वरित थांबवावे, असे ते म्हणाले. जिल्हाधिकारी हे जिल्ह्याचे पालक असले तरी प्रशासनाने जबरदस्तीचे तंत्र अवलंबू नये.

**५०) स्थानिक मूळ निवासी** यांनी इंग्रजीत आक्षेप नोंदविताना सांगितले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी ही नैसर्गिक न्यायाच्या विरुध्द आहे. प्रकल्प बाधितांना स्थानिकांना सदरहू प्रकल्पाविषयी संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. त्यामुळे ही जनसुनावणी ही त्वरित स्थगित करण्यात यावी ही माझी विनंती आहे. ही जनसुनावणी चालू ठेवणे हे संपूर्णतः नैसर्गिक न्यायाच्या विरुध्द आहे. त्यामुळे ही जनसुनावणी प्रक्रिया त्वरित थांबविण्यात यावी.

**५१) श्री बाळकृष्ण बारकू पाटील, वाढवण गाव, तालुका, जिल्हा-पालघरः-**

मी मागे बसलेलो होतो मागे माईक जातच नाही, म्हणून पुढे येऊन बोलावे लागते. जनसुनावणी म्हणजे जनतेच्या भावना लक्षात घेणे आहे.ही चाललेली बैठक ही जनतेसाठी नसून प्रशासनासाठी चाललेली दिसते. सर्व उपस्थित म्हणत आहेत की ही जनसुनावणी ही रद्द झालीच पाहिजे. लोकांना प्रकल्पाचा अपूर्ण अहवाल उपलब्ध करण्यात आलेला आहे.तरी संपूर्ण कागदपत्रे उपलब्ध होईपर्यंत ही जनसुनावणी रद्द झालीच पाहिजे.

५२) श्री संतोष लाखन, तालुका-विक्रमगड, जिल्हा-पालघरः-

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मागे बसलेल्या लोकांनी बोलावे असे सांगितले, म्हणून मी बोलत आहे. या वाढवण बंदर उभारण्यास आमचा तीव्र विरोध आहे.आम्हाला तुमचा तोटा पण नको, फायदा पण नको. आम्हांला तेथून मीठ, बोंबिल, मांदेली मिळते ते आम्हांला पूरेसे आहे.ही जनसुनावणी पर्यावरणविषयक आहे. तर बंदर उभारणीमुळे येथील पर्यावरण हे नष्टच होणार आहे. तरी वाढवण बंदर हे रद्द करण्यात यावे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही जनसुनावणी प्रस्तावित प्रकल्पाबाबत तुमच्या सूचना आणि विचार सरकारला कळवण्यासाठीच आहे. प्रशासनाकडे अभ्यासपूर्ण अधिकारी आहेत, मात्र पूर्ण अहवालही आमच्याकडे अभ्यासासाठी उपलब्ध झालेला नाही. मात्र, पुढच्या भागात बसलेले आमचे प्रतिनिधी आमच्या बाजूने बोलतील. मागच्या लोकांनी पुढे येऊन प्रश्न मांडावेत, अशी सूचना अध्यक्षांनी केली त्यासाठीच ही जनसुनावणी आहे.

**५३) श्री केदार नाईकः-**

यांनी मत मांडले की ही वाढवण बंदर विकारा नसून विनाश आहे याची मी पाच उदाहरणे देत आहे. वाढवण बंदर झाले, तर पाच हजार एकर समुद्रात भराव टाकण्यात येणार आहे, दुसरे कारण - भराव टाकण्यासाठी हजारो टन दगड,माती लागेल, त्यासाठी येथील डोंगर फोडण्यात येतील. तिसरे कारण - जर समुद्रात भराव टाकला, तर पाण्याची पातळी वाढल्याने पाणी दुसरीकडे जाणार, त्याबाबतीतील नियोजन शासन, प्रशासन देत नाही कारण मुंबईचा काही भाग हा पाण्यात जाईल.

चौथे म्हणजे अयोध्येत राम मंदिर बांधत आहेत, मात्र येथील रामाच्या खूणांचा मात्र विचार करण्यात येत नाही.जर श्रीलंकेला रामाचा सेतू आहे, तसेच रामाचे केस, तेथील जैवविविधता, तेथील मासेमारी मी स्वतः दाखविन.

पुढील गोष्ट म्हणजे ही डहाणू तालुका हे मुंबईचे फुप्फुस आहे. हे इंग्रजांच्या काळापासून राखून ठेवलेले आहे. येथे जर बंदर झाले, तर मुंबईचे फुप्फुस खराब होऊन मुंबई ही नष्ट होईल. पैशाच्या नोटी खाऊन माणूस जगूच शकत नाही,त्यासाठी शुध्द हवा, पाणी लागते.येथे डायमेकींगचा व्यवसाय चालतो, त्यासाठी येथील कारागीर प्रसिध्द आहेत.

देशातील बरेच लोक येथे महिना महिना डायमेकिंग करुन घेण्यासाठी येतात. देशतील गि-हाईके आमच्या पायाशी येतात. महिना महिना येथे राहतात. शासनाला त्याच्यापासून उत्पन्न मिळते. येथे मच्छिमारी चालते. त्यावर हजारो लोक अवलंबून आहेत. येथे २-४ गावांचा प्रश्न नसून या प्रकल्पामुळे ४७ गावे उध्वस्त होणार आहेत. तरी आम्ही कुठे जाणार. आम्हांला तुमच्या नोक-या नकोत. तुमचा पैसा, आमिषे नकोत. तुम्ही बेकारांना आमच्याकडे पाठवा, आम्हांला डायमेकींगसाठी माणसे कमी आहेत. मच्छिमारीसाठी माणसे कमी पडतात, माणसे लागत आहेत तरी माणसे पाठवावीत.

